## नेमणे आहे

नामवंत दै. ‘जनता आवाज’ वृत्तपत्रासाठी प्रतिनिधी नेमणे आहेत.

१) अहिल्यानगर
२) पुणे
३) नाशिक
४) छत्रपती संभाजीनगर
५) बीड

संपर्क:- ८८९६७११७११

jantaawajnews@gmail.com

# दैनिक जनता आवाज








अहिल्यानगर | वर्ष ०२ रे | अंक १०५ | गुरूवार, दि. ०५ जून २०२५ | PRGI No. MHMAR/25/RAA11 | पाने ०८ | किंमत ४ रुपये


# २०२६ पासून होणार जातीय जनगणना

- ऑक्टोबर २०२६ पासून चार राज्यांमध्ये जातीय जनगणना
- उर्वरित राज्यांमध्ये मार्च २०२७ पासून होणार जातीय जनगणना
- केंद्राने १ महिन्यापूर्वीच जातीय जनगणनेची केली होती घोषणा

जनता आवाज वृत्तसेवा

**नवी दिल्ली : केंद्र सरकार १ मार्च २०२७ पासून देशात जातीय जनगणना करणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार असे की, जातीय जनगणना प्रथम चार डोंगराळ राज्ये हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, जम्मू आणि काश्मीर आणि लडाखमध्ये पायलट प्रोजेक्ट म्हणून केली जाईल. या राज्यांमध्ये १ ऑक्टोबर २०२६ पासून ती सुरु होईल.**

स्वातंत्र्यानंतर देशात पहिल्यांदाच जातीय जनगणना करण्याची घोषणा केंद्राने ३० एप्रिल रोजी केली होती. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले होते की, मूलभूत जनगणनेसोबतच जातीय जनगणनाही केली जाईल. काँग्रेससह सर्व विरोधी पक्ष जातीय जनगणनेची मागणी करत आहेत.

देशातील शेवटची जनगणना २०११ मध्ये झाली होती. भारतात दर १० वर्षांनी जनगणना केली जाते. त्यानुसार, पुढील जनगणना २०२१ मध्ये होणार होती, परंतु कोविड-१९ साथीच्या आजारामुळे ती पुढे ढकलण्यात आली होती.



तर दुसरकीडे, पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली दिल्ली येथे केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक होत आहे. या बैठकीत जातीच्या जनगणनेशी संबंधित निर्णय घेतला जाऊ शकतो, असे मानले जाते. बैठकीनंतर त्याची घोषणा केली जाऊ शकते.

### एससी-एसटी कुटुंबांचा डेटा प्रसिद्ध

मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०११ मध्ये सामाजिक-आर्थिक आणि जातीय जनगणना करण्यात आली होती. ती ग्रामीण विकास मंत्रालय, शहरी विकास मंत्रालय आणि गृह मंत्रालयाने केली होती. तथापि, या सर्वेक्षणाचा डेटा कधीही सार्वजनिक केला गेला नाही. ग्रामीण विकास मंत्रालयाच्या वेबसाइटवर फक्त एससी-एसटी कुटुंबांचा डेटा प्रसिद्ध करण्यात आला आहे.

### ओबीसींच्या गणनात सुधारणा करा

१९४८ च्या जनगणना कायद्यात एससी-एसटींची गणना करण्याची तरतूद आहे. ओबीसींची गणना करण्यासाठी त्यात सुधारणा करावी लागेल. यामुळे ओबीसीच्या २,६५० जातींचा डेटा उघड होईल. २०११ च्या जनगणनेनुसार, १,२७० एससी आणि ७४८ एसटी जाती आहेत. २०११ मध्ये एससी लोकसंख्या १६.६ टक्के आणि एसटी ८.६ टक्के होती.

## संमिश्र

### आरसीबीच्या विजयी मिरवणुकीत चेंगराचेंगरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**बंगळुरू :** रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या विजयी परेड दरम्यान चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ३ जणांचा मृत्यू झाला आहे. स्थानिक माध्यमांनुसार, ५० हजारांहून अधिक लोक उपस्थित होते. चेंगराचेंगरीत १५ जण जखमी झाले आहेत. एकाची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगण्यात येत आहे. गर्दीत एक मूलही बेशुद्ध पडले, त्याला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. ही घटना चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर घडली.

### हाकेंना झाकणझुल्या पुरस्कार द्या: मिटकरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पुणे :** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अमोल मिटकरी व ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्यात गेल्या काही दिवसांपासून वाद सुरू आहे. एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप सुरू असून आता अमोल मिटकरी यांनी लक्ष्मण हाके यांना एखादा झाकणझुल्या पुरस्कार देण्याची शिफारस करणार असल्याचे खोचक ट्विट केले आहे. त्यामुळे आता पुन्हा दोघांमध्ये वाद आणखी चिघळण्याची शक्यता आहे.

### पंजाबमधील युट्यूबरला अटक

**जनता आवाज वृत्तसेवा**

**चंदीगड :** पंजाब पोलिसांनी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली युट्यूबर जसबीर सिंगला अटक केली आहे. जसबीर सिंग हा रूपनगरमधील महालन गावचा रहिवासी आहे आणि त्याच्या जान महल या युट्यूब चॅनलवर दहा लाखांहून अधिक सबस्क्राइबर्स आहेत. तो ३ वेळा पाकिस्तानला गेला आहे.

### जळगावातील अपघातात दोन भावांचा दुर्दैवी मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जळगाव :** जळगाव जिल्ह्यात दोन वेगवेगळ्या ठिकाणी घडलेल्या भीषण अपघातांमध्ये चार जणांचा मृत्यू झाला असून २० ते २५ जण जखमी झाले आहेत. शहरातील जुना निमखेडी रोडवर पहाटेच्या सुमारास एका अज्ञात वाहनाने रिक्षाला जोरदार धडक दिली. या अपघातात रिक्षातील दोन सख्खे भाऊ, ज्ञानेश्वर झगडू शिवदे आणि प्रमोद झगडू शिवदे यांचा जागीच मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने शिवदे कुटुंबावर शोककळा पसरली आहे.




# नागरिकांना तातडीच्या सेवा द्या

## जिल्हाधिकाऱ्यांकडून मनपाच्या कर्मचाऱ्यांना निर्देश

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** महानगर पालिकेच्या विविध विभागांची आढावा बैठक जिल्हाधिकारी तथा प्रभारी महापालिका आयुक्त पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच पार पडली. या बैठकीत त्यांनी सर्वच विभाग प्रमुखांकडून चालू असलेल्या योजनांची व प्रकल्पांची सविस्तर माहिती घेतली. बैठकीदरम्यान, पंकज आशिया यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, नागरिकांना महापालिकेच्या माध्यमातून मूलभूत सुविधा तातडीने आणि प्रभावी पद्धतीने मिळणे अत्यावश्यक आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने आपल्या कार्यपद्धतीत सुधारणा करणे गरजेचे आहे.



मनपाची जबाबदारी केवळ विकास कामे करणे इतकीच नाही, तर ती कामे वेळेत आणि दर्जेदार रितीने पूर्ण होणे ही देखील तितकीच महत्त्वाची आहे. विभाग प्रमुखांना सूचना देत असताना सांगितले की, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित कृती केली जावी, असे आदेश जिल्हाधिकारी तथा आयुक्त आशिया यांनी दिली.

यावेळी आरोग्य, जलपुरवठा, स्वच्छता, बांधकाम, कर संकलन, विद्युत, बागकाम, नागरी सुविधा, मालमत्ता व्यवस्थापन, वसुली, शिक्षण आदी विभागांतील कामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. प्रत्येक विभाग प्रमुखांनी आपापल्या क्षेत्रातील प्रगती अहवाल सादर करताना पान ४

### माजी मंत्री मुंडे यांचा पाय आणखी खोलात : दमानिया

**जनता आवाज वृत्तसेवा**

**मुंबई :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी बुधवारी धनंजय मुंडे यांच्याविरोधातील कथित कृषी घोटाळ्याचे पुरावे एसीबी अर्थात अँटी करप्शन ब्यूरोला दिले.

तसेच या पुराव्यांमुळे आता धनंजय मुंडे वाचणार नाहीत असा ठाम दावाही केला. त्यांच्या या दाव्यामुळे सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते तथा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचा पाय आणखी खोलात गेल्याचा दावा केला जात आहे. अंजली दमानिया यांनी काही महिन्यांपूर्वी तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप केले होते. त्यानंतर एसीबीने त्यांना या आरोपांचे पुरावे देण्याचा समन्स बजावला होता.

# शनी शिंगणापूरातील शनी मंदिर बंद

## विश्वस्त व ग्रामस्थांच्या बैठकीत निर्णय

**जनता आवाज वृत्तसेवा**

**सोनई :** शनैश्वर देवस्थान शिंगणापूर येथे २७ मे रोजी झालेल्या विश्वस्त मंडळ व ग्रामस्थ यांच्या झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार दि. ११ जुनपासून स्वच्छता व सुरक्षेच्या कारणास्तव शनी मंदिर रात्री १०:३० ते ४ वाजेपर्यंत बंद ठेवण्यात येणार असल्याचे देवस्थानच्यावतीने सांगण्यात आले आहे.

रात्री शनी मंदिर बंद ठेवण्यात येणार असले तरी शनी अमावस्या गुढीपाडवा शनी जयंती या दिवशी मंदिर दर्शनासाठी २४ तास खुले राहणार आहे.

तसेच बैठकीतील निर्णयानुसार ११ जूनपासून पहाटे ४ ते सकाळी ९ वाजेपर्यंत तसेच सायंकाळी आरतीपूर्वी अर्धा तास व आरती नंतर एक तास या कालावधीत शिंगणापूर येथील ग्रामस्थांना दर्शनासाठी स्वतंत्र गावकरी गेट मंदिर कॅम्पसमधील महाद्वाराचे दक्षिण बाजूस असलेल्या रस्त्यावरून सुरू होणार आहे. गावकऱ्यांना आधार कार्ड दाखवूनच गावकरी गेटमधून प्रवेश दिला जाईल दर्शनात जाण्यासाठी गावकऱ्यांसमवेत अन्य कोणालाही प्रवेश दिला जाणार नसल्याचेही बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.



ॲपबाबत गेल्या १५ दिवसांपासून विविध उलटसुलट चर्चा होत असल्याने याची सखोल चौकशी करावी, अशी मागणी अनेकांनी केली आहे. तसेच देवस्थानच्या विविध विभागात अनेक वर्षांपासून कर्मचारी एकाच ठिकाणी काम करत आहे. त्यामुळेच त्यांची मक्तेदारी झाली असल्याचे बोलले जात आहे. ग्रामस्थ व विश्वस्तांच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत काही ग्राम स्थांनी आवाज उठविला होता.

याबाबत विश्वस्त व प्रशासनाने ठोस भूमिका घेऊन बदल्या कराव्या, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

# अतिवृष्टीग्रस्तांना आपत्ती व्यवस्थापनातून निधी द्या

## खा. नीलेश लंके यांची जिल्हाधिकारी आशिया यांच्याकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** नगर तालुक्यातील विविध गावांमध्ये उद्भवलेल्या पूर परिस्थितीमुळे पायाभूत सुविधांची हानी झाली असून त्याची दुरूस्ती व सुशोभीकरणासाठी आपत्ती व्यवस्थापनातून निधी मंजूर करण्याची मागणी खा. नीलेश लंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.



यासंदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, नगर तालुक्यातील गावांमध्ये झालेली अतिवृष्टी व अवकाळी पावसामुळे पूरस्थिती निर्माण होउन सार्वजनिक मालमत्तेस मोठ्या प्रमाणात नुकसान पोहोचले आहे. या आपत्तीमध्ये रस्ते, पुल, स्मशानभुमी, बंधारे, घाट, वस्ती जोड रस्ते आदी पायाभुत सुविधांचे मोठे नुकसान झाले असून त्यामुळे सबंधित ग्रामस्थ मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

सादर करण्यात आलेली ग्रामपातळीवरील कामे केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद निधी व राज्य शासनाच्या राज्य आपत्ती प्रतिसाद निधी अंतर्गत पूर, चक्रीवादळ इत्यादी आपत्ती व्यवस्थापन, पूर नियंत्रण व दुरूस्तीअंतर्गत प्रस्तावित करता येतील याकडे खा. लंके यांनी या निवेदनात जिल्हाधिकाऱ्यांचे लक्ष वेधले आहे.

ही कामे मार्गी लावल्यानंतर या गावांतील ग्रामस्थांना सोयी-सुविधा मिळणार असून ग्रामस्थांचे पुनर्वसन, सुरक्षित प्रवास आणि अंत्यसंस्कार, धार्मिक विधींसाठी सुविधा उपलब्ध होतील. त्यामुळे या कामांच्या निधीसाठी आपत्ती व्यवस्थापन निधी अंतर्गत तातडीने मंजुरी देण्यात यावी व कार्यवाहीस गती देण्यात यावी, अशी मागणी खा. लंके यांनी केली आहे.

या निवेदनामध्ये खा. लंके यांनी पुढील गावांमध्ये विविध कामे प्रस्तावित केली पान ४

### स्मशानभूमी दुरूस्ती व सुशोभीकरण

स्मशानभूमी दुरूस्ती व सुशोभीकरण, काळे वस्ती येथील दोन पुलांची दुरूस्ती, दशक्रिया विधी घाट दुरूस्ती व सुशोभिकरण, बारे मळा शाळेसमोरील परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, दत्त मंदिरासमोरील परिसरात पेव्हिंग ब्लॉक बसविणे, सारोळा गावठाण ते कडूस वस्ती रस्ता दुरूस्ती करणे.

# अजित पवारांच्याच पक्षात गटबाजी

## आ. रोहित पवार यांचा दावा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आ.रोहित पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रचंड गटबाजी असल्याचा आरोप केला आहे. आमच्या नव्हे तर अजित पवारांच्याच पक्षात मोठी गटबाजी आहे. त्यांच्यावर आरोप होत असताना त्यांच्या बचावासाठी कुणीही पुढे येत नाही, यावरून हे सिद्ध होते, असे ते म्हणालेत.



गत काही महिन्यांपासून सत्ताधारी महायुतीच्या नेत्यांकडून सातत्याने महाविकास आघाडीत फूट पडल्याचा आरोप होत आहे. पण आता आमदार रोहित पवार यांनी विरोधकांत नव्हे तर सत्ताधाऱ्यांतच दुही माजल्याचा आरोप केला आहे. विशेषतः अजित पवारांवर आरोप होत असताना त्यांच्या पक्षातील एकही नेता त्यांच्या समर्थनार्थ पुढे येत नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

जसे सत्ताधारी पक्षांच्या मित्रपक्षांमध्ये गट पडले आहेत, तसे महायुतीमध्येही गट पडलेत. अजित पवारांचा पक्ष एकनाथ शिंदेंच्या पक्षावरील आरोपांवर बोलत नाही. शिंदेंचा पक्ष अजितदादांच्या पक्षावर काही बोलत नाही. विशेषतः भाजप यात कुठेच दिसत नाही. भाजप मागे बसून केवळ तमाशा पाहण्याचे काम करतो. त्यामुळे महायुतीमधील घटक पक्षांमध्ये गट-तट पडले पान ४

> अजित पवार एकटेच आपल्या पक्षासाठी लढत आहेत. त्यांच्या पक्षाचे बाकीचे नेते काय करतात? त्यांच्या नेत्यांवर आरोप होत असताना हे नेते काहीच बोलत नाहीत, पण दुसऱ्यांवर आरोप होत असताना त्यांचे मोठमोठे बोलण्यासाठी पुढे येतात. मग याला काय म्हणायचे? त्यांच्या पक्षामध्येच अंतर्गत कुठेतरी गट पडलेत असे आपल्याला म्हणावे लागेल.
>
> **-रोहित पवार, आमदार**

# विवेक कोल्हे यांच्यामुळे हाडोळ रस्ता सुरु : वाकचौरे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** तालुक्यातील गोधेगाव येथील मागील वीस वर्षांपासून रखडलेला हाडोळ रस्ता अखेर सुरु करण्यात आला असून यामागे कोल्हे कारखाना अध्यक्ष युवानेते विवेक कोल्हे यांचे मोलाचे प्रयत्न आहेत. या रस्त्याचा उपयोग प्रामुख्याने गोरगरीब शेतकरी व मागासवर्गीय समाजबांधवांना शेतीसाठी ये-जा करण्यासाठी होत असून, रस्ता बंद असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.



या समस्येने सर्व त्रस्त झालेले होते मात्र आता काम मार्गी लागल्याने सर्वत्र आनंदाचे वातावरण झाले आहे अशी प्रतिक्रिया प्रगतशील शेतकरी भाऊसाहेब वाकचौरे यांनी दिली आहे.

गोधेगाव येथील भाऊसाहेब वाकचौरे, राजेंद्र हुसळे, नामदेव वाकचौरे महाराज, विष्णू हुसळे, चांगदेव हुसळे, प्रल्हाद दुशिंग, रामभाऊ वाकचौरे, रामदास गोरे, लक्ष्मण वाकचौरे, पवन सोळशे, भाऊसाहेब शिरसाट, भिमराज हुसळे, कैलास हुसळे, राहुल लालवाणी, सुभाष कानडे व रवींद्र रांधवणे या शेतकऱ्यांनी सातत्याने विवेक कोल्हे यांच्याकडे पान ४

# माजी मंत्री थोरातांमुळेच संगमनेरात जलसमृद्धी

## रणजितसिंह देशमुख; अंभोरे, पिंपारणे, पानोडी, मालुंजे बंधाऱ्यांचे जलपूजन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** निळवंडे धरण व कालव्यांचे निर्माते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून आणि पाठपुराव्यामुळे झालेल्या डाव्या व उजव्या कालव्यातून आलेल्या पाण्यामुळे संगमनेर तालुक्यांमधील विविध गावांमधील बंधारे व गाव तळी भरण्यात आली आहे. यामुळे तालुक्यात जलसमृद्धी निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील अंभोरे, पानोडी, मालुंजे पिंपारणे येथे राजहंस दूध संघाचे चेअरमन देशमुख यांच्या हस्ते उजव्या कालव्यातून करण्यात आलेल्या बंधाऱ्यांचे जलपूजन करण्यात आले.



यावेळी संचालक सतीश वर्पे, गंगाराम वाकचौरे, अण्णासाहेब राहिंज, लहानभाऊ वर्पे, रवींद्र रोहम, अरुणराव देशमुख, शुभम काळे, दिनकर वाकचौरे, नवनीत देशमुख, राजेंद्र देशमुख, सरपंच नारायण मरभळ, अरुण राहिंज, रमेश राहिंज, बाबासाहेब राहिंज, संजय राहिज, कृष्णा रकटे, भिमाजी राहिंज यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उजव्या कालव्यातून कालव्या लगतच्या गावांना पाणी मिळावे याकरता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपयांचे पाईप देण्यात आले असून या माध्यमातून या गावांमधील बंधारे भरवण्यात आली आहे. या पाण्याने भरलेल्या बंधाऱ्यांचे जलपूजन मोठ्या आनंदाने करण्यात आले.

> ज्या लोकांनी धरणाला विरोध केला त्यांची आज सत्ता आहे. त्यांचे कालवे आणि धरणामध्ये कोणतेही योगदान नाही. निळवंडे चे पाणी तालुक्यातील प्रत्येक गावात येणे हा तालुक्यासाठी आनंदाचा क्षण आहे. याप्रसंगी गावोगावी मोठ्या उत्साहात जल पूजन करण्यात आले यावेळी गावातील युवकांनी मिरवणूक काढून आनंद उत्सव साजरा केला.
>
> **- अण्णासाहेब राहिंज**

> माजी मंत्री थोरातांच्या पाठपुराव्यामुळे आज दोन्हीही कालव्यांमधून पाणी सुरू आहे. यामुळे या भागातील बंधारे पाण्याने भरून घेण्यात आली आहे. यामुळे शेतीसाठी मोठा उपयोग होणार असून पाण्यामुळे जलसमृद्धी निर्माण झाली आहे. दुष्काळी तालुक्याचे रूपांतर प्रगतशील तालुक्यामध्ये झाली असून कृषी दुग्ध शिक्षण सहकार अशा सर्व क्षेत्रांमध्ये संगमनेर तालुका हा राज्याला दिशादर्शक ठरत आहे.
>
> **- रणजितसिंह देशमुख**

रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, विभागाच्या विकासाकरता पाणी हे अत्यंत महत्त्वाचे असून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी पान ४

# प्रवरेच्या कृषिदूतांचे कोल्हेवाडीत आगमन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील कोल्हेवाडी येथे कृषी महाविद्यालय, लोणी येथील कृषिदूतांचे आगमन झाले आहे. यावेळी गावातील ग्रामस्थ व शेतकऱ्यांनी या कृषिदूतांचे स्वागत केले.

लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत कृषी महाविद्यालय, लोणी येथे हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम आणि कृषी महाविद्यालय लोणीचे प्राचार्य डॉ. दिलीप महाले यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप आणि प्रा. अक्षया वाळुंज यांच्या सुचनेनुसार कृषीदूत इंद्रजित दिघे, सार्थक दिघे, सौरभ पागार, कार्तिक म्हसे, प्रतीक गोसावी, प्रतीक ढवळे हे कोल्हेवाडी येथील शेतकऱ्यांचे अनुभव जाणून घेत त्यांना मार्गदर्शन करणार आहेत.

याप्रसंगी ग्रामपंचायत कोल्हेवाडीचे सरपंच सुवर्णा दिघे, उपसरपंच जालिंदर दिघे, ग्रामविकास अधिकारी भाऊसाहेब क्षीरसागर, ग्रामपंचायत कर्मचारी अमोल कोल्हे, ग्रामस्थ अमोल काळे, बाळासाहेब खुळे व इतर यांनी स्वागत केले.

कृषी शिक्षणाच्या माध्यमातून हे कृषिदूत येथील शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती, बीजप्रक्रिया, गांडूळखत उत्पादन, चारा पिके, दुग्ध व्यवसाय, बायोगॅस आदी संदर्भात माहिती देणार आहे.

# कोपरगाव बसस्थानक परिसरातील अतिक्रमणांवर हातोडा

## ... अखेर कोपरगाव नगरपरिषदेची पुन्हा धडक कारवाई; अतिक्रमणधारकांवर दंडात्मक कारवाई

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव शहर :** कोपरगाव शहरातील मेन रोड वरील पूर्वी काढलेल्या जागेवर पुन्हा काही नागरिकांनी केलेल्या अतिक्रमणावर कोपरगाव नगरपरिषदेने दि. ४ जून २०२५ रोजी अतिक्रमण हटाव मोहीम हाती घेतली असून मेन रोड भागातील तसेच अहिल्या स्तंभाच्या आजूबाजूच्या परिसरातील तसेच बस स्थानक प्रवेशद्वारा जवळील तसेच धारणगाव रोडवरील अनेक अतिक्रमणे काढण्यात आली.



याबाबत दोन दिवसांपूर्वी नगरपरिषदेकडून अतिक्रमणे हटविण्या संदर्भात लाऊड स्पीकरद्वारे सांगण्यात आले होते. मात्र काही नागरिकांनी नगरपरिषदेने केलेल्या आवाहनाला प्रतिसाद न दिल्याने अखेर नगरपरिषद प्रशासनाला कठोर भूमिका घ्यावी लागली. त्या अनुषंगाने दि. ४ जून २०२५ रोजी सकाळी कोपरगाव नगरपरिषदेने आपले अतिक्रमण पथक घेऊन मेन रोडवरील तसेच मेन रोडच्या दुतर्फा केलेले अनाधिकृत अतिक्रमणे तसेच बस स्थानक प्रवेशद्वारा जवळी व परिसरातील अनधिकृत अतिक्रमण केलेल्या ठिकाणी अतिक्रमण पथक येऊन धडक कारवाई केल्याने एकच धावपळ सुरू झाली.

यावेळी अनेक बघणाऱ्यांनी देखील एकच गर्दी केली. मात्र काही दिवसापूर्वी काढलेली अतिक्रमणे काही नागरिकांनी पुनर्जीवित केले होते. तेच अतिक्रमणे नगरपरिषदेने पुन्हा उध्वस्त केले. तसेच हातगाड्या व पावसासाठी संरक्षणासाठी उभं केलेले बारदाने, ताडपत्री व लाकडी बल्ल्या अतिक्रमण पथकाने काढून ते जप्त केले असून त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येणार असल्याचे अतिक्रमण पथकातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

### पथकाकडून अतिक्रमण काढताना दुजाभाव

नगरपरिषद प्रशासनाने स्वबळावर अतिक्रमण हटाव मोहीम राबवली. मात्र उपस्थित नागरिकांच्या मते अतिक्रमण पथकाने अतिक्रमण काढतांना दुजाभाव केल्याचे पुन्हा एकदा दिसून येत होते. काही प्रतिष्ठित किंवा ज्यांना राजकीय वलय आहे. अशा लोकांच्या अतिक्रमणांकडे प्रशासनाने कानाडोळा केल्याचे तेथे उपस्थित नागरिकांमध्ये दबक्या आवाजात कुजबूज चालू होती.

# दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला डोंगरेंकडून हातभार



**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नवीन शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभीच सामाजिक कार्यकर्ते व ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे यांनी सामाजिक जाणीव ठेवून दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे वाटप करून शैक्षणिक मदतीचा हात पुढे केला.

स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ व धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने सावली दिव्यांग संस्थेचे अध्यक्ष बाबासाहेब महापुरे यांच्याकडे दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी वह्यांचे संच सुपूर्त करण्यात आले.

पै. नाना डोंगरे म्हणाले की, शिक्षण हा प्रत्येक मुलाचा मूलभूत हक्क आहे. आर्थिक व शारीरिक अडचणीमुळे कोणीही शिक्षणापासून वंचित राहू नये, यासाठी संस्थेच्या माध्यमातून हा छोटासा प्रयत्न आहे. दिव्यांग विद्यार्थ्यांना योग्य सुविधा मिळाल्यास ते निश्चितच उज्वल यश प्राप्त करू शकतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीने अशा गरजू मुलांच्या शिक्षणासाठी पुढे येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

> पै. नाना डोंगरे यांच्यासारखे संवेदनशील लोक कार्यकर्ते दिव्यांगांना वेळोवेळी मदतीचा हात देत आहेत. त्यांच्या या मदतीमुळे अनेक दिव्यांग मुलांचा शिक्षणाचा प्रवास सुलभ होत आहे. या उपक्रमामुळे मुलांमध्ये आत्मविश्वास वाढतो व समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील होण्यास प्रेरणा मिळत आहे.
>
> **- बाबासाहेब महापुरे**

# ...त्यांना बोलण्याचा नैतिक अधिकार नाही : राजेंद्र उंडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** संगमनेर तालुक्यातील श्रीक्षेत्र कासारे श्री कालिका देवी संस्थान देवस्थानला यात्रेची वर्गणी जे समाज बाधव देत नाही, त्या समाज बांधवाना देवस्थानच्या कोणत्याही कारभाराबद्दल बोलण्याचा नैतिक अधिकार नाही, असा सल्ला उंबरे येथील देवस्थानचे विश्वस्त राजेंद्र उंडे यांनी दिला आहे.

उंडे पुढे म्हणाले की, विश्वस्त मंडळ निवडीसाठी आम्ही राहुरी तालुक्यातील सर्व समाज बांधवाना विश्वासात घेणे आवश्यक होते. पण आम्ही समाजाला अंधारात ठेवून देवस्थानच्या विश्वस्त मंडळाच्या निवडी जाहिर करण्यात आल्या आहे. कासारे देवस्थान हे अतिशय खडतर ठिकाणी आहे की, जिथे उन्हाळ्यात पाणी देखील पाहायला मिळत नाही, अशा ठिकाणी सर्वसामान्य घरातील मुलांनी एक ग्रुप करून यात्रा कशी सुरळीत पार पडेल.

> सर्वांना अन्नदान कसे मिळेल आणि सर्व लोकांचे आशीर्वाद कसे मिळतील आणि देवस्थान कसे टिकेल यासाठी प्रयत्न केले आहे. आम्ही पदर मोड करून यात्रा उत्सव साजरा करतो. समाजातील विघ्नसंतोषी लोकं कायम खोटे-नाटे आरोप करून देवस्थानला बदनाम करण्यासाठी सात्याने प्रयत्न करत आहेत, त्याचा मी व्यक्तीश: निषेध व्यक्त करतो.
>
> **- राजेंद्र उंडे**

## -निधनवार्ता-

### शंकर मगर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** संगमनेर तालुक्यातील सादतपूर येथील प्रगतशिल



शेतकरी शंकर चंद्रभान मगर यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्यामागे दोन मुले, एक भाऊ,पाच बहिणी, एक मुलगी, पत्नी, सुना, नातू, नातवंडे असा परिवार आहे. दिपक आणि राजेंद्र मगर यांचे ते वडील तर ॲड. मंगेश वामन यांचे सासरे होते.

### मच्छिंद्र दानवे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** नगर छत्रपती-संभाजीनगर रोडवरील



गजराज नगर येथील रहिवासी मच्छिंद्र रामभाऊ दानवे यांचे निधन झाले. ते ५४ वर्षांचे होते. त्यांच्या मागे आई, पत्नी, दोन मुली, मुलगा, जावई, नातू असा परिवार आहे. पत्रकार विजय मते यांचे ते व्याही होते.

### विठ्ठल भांड

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खर्द :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील विठ्ठल अंबादास



भांड (वय ७३) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, भावजय, मुलगा, मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य प्रा. अण्णासाहेब व भारत भांड यांचे बंधू तर ज्ञानेश्वर भांड यांचे ते वडील होत.

### प्रल्हाद सुरतवाले

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** भोसले आखाडा येथील रहिवासी



प्रल्हाद निवृत्ती सुरतवाले (वय ५२) यांचे ३ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर ४ जून रोजी नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, २ मुले, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

# भाजपाच्या पदाधिकारी निवडीत शिंदेंना संधी : कोरडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पारनेर :** भाजपाच्या पदाधिकारी निवडीत सामान्य कार्यकर्त्यांना चा प्रथम विचार केला जातो व त्यांनाच सर्वप्रथम संधी दिली जाते हे किसनराव शिंदे यांची निघोज-कान्हूर पठार मंडलाध्यक्ष पदावर झालेल्या निवडीवरून दिसून येते, असे प्रतिपादन भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे यांनी केले आहे.

भाजपाच्या नवनिर्वाचीत जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, मंडल पदाधिकारी किसन शिंदे, राहूल शिंदे, दिपक कार्ले व पारनेर तालुक्यातील पत्रकारांचा भव्य नागरी सन्मान अळकुटी येथे भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी



सदस्य भानुदास बेरड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमात करण्यात आला.

विश्वनाथ कोरडे म्हणाले की, भाजपाचे कार्यकर्ते आहे, त्या परिस्थितीत काम करतात. लोकसभा निवडणुकीत डॉ. सुजय विखे पाटील यांना अळकुटी पंचायत समिती गणात ७ हजार मतांची पिछाडी होती. पण येथील भाजपाच्या कार्यकर्त्यांच्या हातात कोणतीही सत्ता नसतानाही ते काम करतात. पण किसनराव शिंदे हे माळी समाजाचे प्रतिनिधी आहेत. त्यांच्या निवडीचा निर्णय माजी खा. सुजय विखे पाटील यांनी घेतला. त्यांच्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला पक्षाने मंडलाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी दिल्याने आता नव्याने सुरवात करावी लागेल.

यावेळी सचिन वराळ पाटील, राहुल शिंदे, जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, माजी जिल्हाध्यक्ष भानुदास बेरड यांसह आदींची भाषणे झाली.या सत्कार कार्यक्रमाला सोनाली सालके, सुभाष वराळ, सागर मैड, सुभाष दुधाडे, पंकज कारखिले, सरपंच भास्करराव उचाळे, सरपंच कोमल भंडारी, उपसरपंच बाळासाहेब धोत्रे, चंद्रकांत शिंदे, लता घोलप, मधुकर जाधव, कृष्णाजी बडवे, अतुल माने, राहुल नरड, महेंद्र शिरोळे, संपत शिरोळे, राजेंद्र खोसे, लहू भालेकर, कैलास बरशिले, लहू निचीत, दिपक लंके, विशाल जगताप, विश्वनाथ येवले, शरद शिरोळे, गोरख जाधव, सुधीर परंडवाल, शशिकांत शिंदे, सुदाम शिंदे, सावकार शिरोळे, संध्या शिंदे, वृषाली शिरोळे, भक्ती शिरोळे आदी उपस्थित होते.

> निघोज-कान्हूर पठार मंडलाध्यक्षपदी निवड झालेले किसनराव शिंदे हे इतर मागासवर्गीय माळी समाजातील शेतकरी कुटुंबात जन्मलेले आहेत. वडील मयत असून आई जन्मजात मुकी असून त्यांना बोलताही येत नाही. पण लेकाचा सत्कार, सन्मान व कौतूक पाहून माऊलीचे डोळे भरून येत होते. ते पाहून अनेकांच्या डोळ्यांतून अश्रू अनावर होत होते.

# विजेचा शॉक बसून महिलेचा मृत्यू

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पहाटे उठून जनावरांसाठी चारा कापण्यासाठी गोठ्यात कडबाकुट्टी मशीन चालू करायला गेलेल्या म हिलेचा विजेचा शॉक बसून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील गुंडेगाव शिवारातील हराळमळा येथे ३ जून रोजी सकाळी घडली.

सुजाता संभाजी भापकर (वय ३६) असे मयत महिलेचे नाव आहे. सुजाता भापकर यांना विजेचा शॉक बसून त्या बेशुध्द पडल्याने निदर्शनास येताच त्यांचे पती माजी सैनिक संभाजी तुकाराम भापकर यांनी त्यांना तातडीने उपचारासाठी नगरच्या जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविले.

तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ.बटूळे यांनी त्यांना तपासून त्या उपचारापूर्वीच मयत झाल्याचे घोषित केले.

# कामगारानेच लुटले लाखो रुपयांसह स्वॅप मशीन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**राहुरी खुर्द :** पेट्रोल पंपावर कामगार म्हणून असलेल्या तरूणाने पेट्रोल व डिझेल विकून आलेली लाखो रुपयांची रोख रक्कम तसेच स्वॅप मशीन चोरुन नेल्याची घटना राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ शिवारात दि. १ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली.

शिरीष तुकाराम निमसे (वय ३५) हे राहुरी तालुक्यातील टाकळीमियाँ येथे राहत असुन त्यांचा टाकळीमियाँ ते राहुरी जाणारे रोडवर शंकर पार्वती या नावाने भारत पेट्रोलियम कंपनीचा पेट्रोल पंप आहे.

आरोपी सागर साळुंके हा शिरीष निमसे यांच्या पेट्रोल पंपावर गेल्या एक वर्षापासुन कामगार म्हणून काम करत आहे. दि. १ जून रोजी सकाळी ८ वाजता कामावर आला होता. रात्री ११.३० मॅनेजरने त्याला दिवसभराचा हिशोब घेण्यासाठी बोलावले. त्यावेळी त्याचे दोन मित्र तेथे आले होते.

तेव्हा आरोपी सागर साळुंके हा दिवसभर पेट्रोल व डिझेल विकून जमा झालेली दिड लाख रुपए रोख रक्कम व २५ हजार रुपए किंमतीचे स्वॅप मशीन असा एकूण १ लाख ७५ हजार रुपयांचा मुद्देमाल घेऊन पसार झाला. शिरीष तुकाराम निमसे यांच्या फिर्यादीवरून आरोपी सागर बाबासाहेब साळुंके (रा. वाघाचा आखाडा, ता. राहुरी) याच्यावर राहुरी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेचा पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहे.

# नगरचे प्रा.विजय शिंदे सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** आयडीवायएम फाऊंडेशन व इसरो यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई येथे पार पडलेल्या महाराष्ट्र शिक्षा भूषण २०२५ या सोहळ्यात नगर येथील प्रा. विजय शिंदे यांना यंदाचा महाराष्ट्र शिक्षा भूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. चेतना पब्लिकेशनचे विभागीय संचालक राज शर्मा यांच्या हस्ते हा पुरस्कार देण्यात आला. यावेळी अजय चौबे, स्नेहालय शाळेच्या मुख्याध्यापिका वीणा मुंगी, विवेकानंद स्कुल च्या कांचन पापडेजा उपस्थित होत्या.

# १०-१२ वीच्या विद्यार्थिनींना 'मी सावित्रीची लेक' पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** स्त्री जन्माचे स्वागत उपक्रम, श्रमिकनगर यांच्या वतीने दरवर्षी मी सावित्रीची लेक पुरस्कार १०-१२ वीमध्ये ७० टक्क्यांपासून पुढे गुण मिळवून उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थिनींना दिला जातो. दिवंगत विठ्ठल बुलबुले यांच्या प्रेरणेतून या पुरस्काराची सुरुवात करण्यात आली आहे.

मार्च २०२५ च्या परीक्षेत ज्या मुलींना १०-१२ वीमध्ये ७० टक्क्यांपासून पुढे गुण मिळवून




उत्तीर्ण झालेल्या आहेत. त्यांना मी सावित्रीची लेक पुरस्कार दिला जाणार आहे. त्यासाठी इच्छुक विद्यार्थिनींनी मार्कशीट झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, १ पासपोर्ट फोटो, मोबाईल नंबर हे पुरस्कारासाठी लागणारे कागदपत्रे खालील पत्त्यावर पाठवावीत. तसेच यावर्षी पासून ज्यांनी रात्र शाळा किंवा १७ नंबर फॉर्म भरून १०-१२ वी परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले आहेत, अशा महिलांचा व मुलींचा सन्मान करण्यात येणार आहे. त्यांना टक्केवारीची अट नाही, या वर्षीचा जागतिक महिला दिनानिमित्त यावर्षी किंवा याआधी पदवी प्राप्त केलेल्या मुली व महिलांचा सन्मान करण्यात येणार आहे.

# आज 'व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान'

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** संयुक्तराष्ट्र संघाकडून दरवर्षी ५ जून रोजी 'विश्व पर्यावरण दिवस' आयोजित केला जातो. या वैश्विक पुढाकारातून प्रेरणा घेत सद्गुरु माता सुदिक्षाजी महाराज यांच्या लोकमंगलकारी व दूरदर्शी नेतृत्वाखाली संत निरंकारी मि शनची सामाजिक शाखा संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशन संयुक्त राष्ट्रकडून निर्धारित थीम 'बीट प्लास्टिक सोल्युशन' ला केंद्रीभूतठेवत देशभरातील १८ प्रमुख पर्वतीय पर्यटन स्थळावर ५ जून रोजी सकाळी ८ ते दुपारी २ या वेळेत एक व्यापक वृक्षारोपण व स्वच्छता अभियान आयोजित करीत आहे.

# झाडांचे संवर्धन करुन राबविले स्वच्छता अभियान

## चांदबिबी महाल येथून हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या पर्यावरण संवर्धन सप्ताहाला प्रारंभ

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** वर्षभर वृक्षारोपण व संवर्धनाची मोहिम चालविणाऱ्या हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या पर्यावरण संवर्धन सप्ताहाचे शुभारंभ चांदबिबी महाल येथे विविध उपक्रमांनी करण्यात आले. दि. १ ते ७ जून दरम्यान पर्यावरण संवर्धन सप्ताहातंर्गत वृक्षारोपण, संवर्धन, स्वच्छता अभियान राबविण्यात येणार आहे.

चांदबिबी महाल येथे १ जून रोजी असलेल्या ग्रुपच्या सदस्यांचा वाढदिवस सामुदायिकपणे वृक्षारोपणाने साजरा करण्यात आला. तर लावण्यात आलेल्या झाडांना पाणी देवून वृक्षसंवर्धनाचा संदेश देण्यात आले. यावेळी महाल परिसरात स्वच्छता अभियान राबवून मोठ्या प्रमाणात प्लास्टिकचा कचरा संकलन करण्यात आला. पर्यावरणाला घातक ठरत असलेल्या प्लास्टिक मुक्तीचा संदेश देऊन नागरिकांना पर्यावरण रक्षणाची शपथ देण्यात आली.

ग्रुपचे ज्येष्ठ सदस्य सीए रवींद्र कटारिया यांची मुलगी



सीए धनश्री पुनीत बच्छावत यांनी अहमदाबाद आयआयएम येथून एक्झिक्युटिव्ह ल्युमिनी झाल्याबद्दल ग्रुपचे वतीने तिचा विशेष सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष संजय सपकाळ, रमेश वराडे, सचिनशेठ चोपडा, जहीर सय्यद, दिलीपराव ठोकळ, सीए रवींद्र कटारिया, सीए श्रेयांश कटारिया, भारतीताई कटारिया, सीए श्रेणीक कटारिया, अनुष्का कटारिया, पार्श बच्छावत, शिवाय कटारिया, प्रांजली सपकाळ, सुरेखाताई तोरडमल, संगीता सपकाळ, कांताताई गांधी आदी उपस्थित होते.

> पृथ्वीचे अस्तित्व टिकवण्यासाठी, तिचे सौंदर्य हिरवाईने फुलविण्याची गरज आहे. जंगल तोड झाल्याने पर्यावरणाचे प्रश्न निर्माण झाले असून, भविष्याचा विचार करुन वृक्षारोपण व संवर्धन चळवळ काळाची गरज बनली आहे. मे महिन्यात झालेला मुसळधार पाऊस हा पर्यावरणाच्या गंभीर प्रश्नाचा इशारा असून, सर्वांनी या चळवळीत योगदान द्यावे.
>
> **- संजय सपकाळ**

> हरदिन मॉर्निंग ग्रुपच्या वतीने वेळोवेळी झालेल्या सन्मानाने पुढील वाटचालीस प्रेरणा मिळाली. कुटुंबीयांच्या वतीने झालेला सन्मान हा आनखी चांगले कार्य करण्यास ऊर्जा देत आहे.
>
> **- धनश्री बच्छावत**

# जिल्हाधिकाऱ्यांनी घेतला योजनांचा आढावा

## नूतन प्रशासकीय इमारतीच्या कामाची केली पाहणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** नव्याने जिल्हाधिकारीपदाचा कार्यभार स्वीकारलेल्या डॉ. पंकज आशिया यांनी पाथर्डी तालुक्याचा दौरा करून विविध शासकीय विभागांची सविस्तर आढावा बैठक बुधवारी घेतली. त्याचप्रमाणे पाथर्डी शहरातील नगरपरिषदेच्या नूतन प्रशासकीय इमारतीच्या कामाची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली. पाथर्डी तहसील कार्यालयात झालेल्या या बैठकीत त्यांनी महसूल, पोलिस, सार्वजनिक बांधकाम, नगरपरिषद, भूअभिलेख, कृषी, पंचायत समिती आदी विभागांच्या कामकाजाचा आढावा घेतला. ही बैठक त्यांचा तालुक्यातील पहिला दौरा असल्याने विशेष महत्त्वाची ठरली.

या बैठकीत प्रांताधिकारी प्रसाद मते, तहसीलदार डॉ. उद्धव नाईक तसेच इतर खात्यांचे प्रमुख अधिकारी व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. सर्व खात्यांचे काम स्वतंत्रपणे तपासून अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधण्यात आला.

जिल्हाधिकारी आशिया यांनी ई-हक्क प्रणाली, प्रधानमंत्री आवास योजना, जल जीवन मिशन, मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजना, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत योजना, स्वच्छ भारत मिशन यासारख्या महत्त्वाच्या योजनांची प्रगती जाणून घेतली. यावेळी त्यांनी अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी सोडवण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या.

नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे झालेल्या शेतीच्या नुकसानीचा पंचनामाही जवळजवळ पूर्ण झाल्याचे सांगितले. उर्वरित २० टक्के पंचनामे पुढील दोन दिवसांत पूर्ण करून शासनाकडे अनुदानाची मागणी पाठवण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

### पुढील बैठकीत योजनांचा आढावा घेणार

दौऱ्याच्या शेवटी त्यांनी पाथर्डी नगरपरिषदेच्या नव्या प्रशासकीय इमारतीची पाहणी करून मुख्याधिकारी संतोष लांडगे यांच्याकडून कामकाजाची माहिती घेतली आणि आवश्यक सूचना केल्या. शासकीय योजना राबवताना येणाऱ्या अडचणी समजून घेण्यासाठी हा दौरा महत्त्वाचा होता. पुढील बैठकीत याच योजनांच्या प्रगतीचा आढावा घेऊन कार्यपद्धतीत सुधारणा सुचवण्यात येतील, असे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी सांगितले. या दौऱ्याने पाथर्डी तालुक्यातील प्रशासकीय कामकाजाला गती मिळण्याची अपेक्षा आहे.



# जिल्हाधिकारी स्वामींचे देवगड दर्शन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** श्रीक्षेत्र देवगड संस्थान. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी महोदय श्री.दिलीप स्वामी यांनी कुटुंबियांसमवेत भगवान श्री दत्तप्रभूंचे दर्शन घेतले. पंचमुखी सिद्धेश्वर तथा श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबांचे दर्शन घेत संपूर्ण देवालय परिसरामध्ये क्षेत्रप्रदक्षणा करत मनोभावे देवदर्शन घेऊन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आनंद व्यक्त केला.

श्री क्षेत्र देवगड संस्थान येथे असलेली वनराई, अमृतवाहिनी पवित्र प्रवरा नदी पात्र, त्यावरील दगडी घाट, परिसरातील स्वच्छता ही सर्व पाहून मन भारावून गेल्याची भावना यावेळी जिल्हाधिकारी महोदयांनी व्यक्त केली. याप्रसंगी त्यांचे समवेत पत्नी कन्या व बजरंग विधाते हे उपस्थित होते. जिल्हाधिकारी महोदयांनी अजान वृक्ष बागेमध्ये काही काळ कुटुंबीयांसमवेत अनुष्ठान केले.

श्री गुरुदेव दत्त पिठ श्रीक्षेत्र देवगड संस्थानचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांनी जिल्हाधिकारी दिलीप स्वामी व कुटुंबियांचे श्री क्षेत्र देवगड संस्थानच्या वतीने शाल श्रीफळ देऊन स्वागत सन्मान केला. याप्रसंगी व्यवस्थापक चांगदेव साबळे, महेंद्र फलटणे, बाबासाहेब कानडे उपस्थित होते.



# पारंपरिक पांदन रस्ता केला बंद

## शेतकऱ्यांचा प्राणांतिक उपोषणाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** माळीबाभुळगाव येथील शेतकऱ्यांच्या संयमाचा बांध तुटण्याच्या मार्गावर आहे. गट क्रमांक ५८१ व ५८८ मधील शेतजमिनींना जाणारा वर्षानुवर्षे चालू असलेला पारंपरिक पांदन रस्ता अचानक बेकायदेशीरपणे बंद करण्यात आल्याने शेतकरी हतबल झाले असून, प्रशासनाकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी करत ते प्राणांतिक उपोषणाची चेतावणी देत आहेत.

शेतकऱ्यांच्या म्हणण्यानुसार, गट क्रमांक ५८९ चे जमीनधारक सोपान मोहन शेळके व सरस्वती सोपान शेळके यांनी हा रस्ता अडवून टाकला आहे. सदर पांदन रस्ता हा केवळ मार्ग नसून, त्यांच्या रोजच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. हाच एकमेव मार्ग गट क्रमांक ५८१ व ५८८ मधील शेतजमिनींना पोहोचण्यासाठी वापरला जात होता. सद्यस्थितीत रस्ता बंद झाल्यामुळे शेतीशी संबंधित सर्व कामे ठप्प झाली असून, शेतीमालाची वाहतूकही थांबली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे.

या अन्यायकारक कृत्याविरोधात आवाज उठवण्यासाठी आण्णासाहेब चांगदेव भोईटे, दादासाहेब चांगदेव भोईटे, रमेश चांगदेव भोईटे, रामकृष्ण चांगदेव भोईटे, नारायण विठोबा भोईटे, मिठू नारायण भोईटे, सुधाकर भागुजी वायकर, सुनिता सुधाकर वायकर, आजिनाथ नामदेव डोमकावळे, पिराजी नामदेव पवार, शहाबाई दादासाहेब भोईटे यांच्यासह इतर शेतकऱ्यांनी तहसीलदार पाथर्डी यांच्याकडे लेखी निवेदन दिले आहे.

# अॅड. सदावर्ते आज शेवगावात

**जनता आवाज वृत्तसेवा**



**शेवगाव :** प्रसिद्ध वकील अॅड. गुणरत्न सदावर्ते आज गुरूवारी शेवगाव तालुक्यात भेटीला दुपारी ४ वाजता येत असल्याची माहिती गौतम दहातोंडे यांनी दिली आहे. अॅड. गुणरत्न सदावर्ते हे शेवगाव तालुक्यातील बहुचर्चित रामा दहातोंडे हत्याकांडातील कुटुंबाला भेट देणार असल्याचे माहीत रामा दहातोंडे यांचे चिरंजीव गौतम दहातोंडे यांनी दिली.

सदावर्ते अगोदर अहिल्यादेवी नगर चे पोलीस अधीक्षक यांची भेट घेऊन दहातोंडे हत्याकांडातील पोलीस तपासा विषयी माहिती घेणार आहेत. नंतर ते शेवगाव तालुक्यातील नागलवाडी येथे जावून दहातोंडे कुटुंबाला सांत्वनपर भेट देणार आहेत.

# किराणा दुकानात भरदिवसा चोरी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कर्जत :** जिल्ह्यामधील कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथे शिवदत्त किराणा अॅड. जनरल स्टोअर्स या दुकानांमध्ये भर दिवसा दुपारी चार वाजण्याच्या सुमारास दोन चोरट्यांनी पाण्याची बॉटल खरेदी करण्याचे निमित्त करत महिला व्यापारी यांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने चोरून नेले आहे.ही घटना सीसीटीव्ही कॅमेरेमध्ये कैद झाली आहे.




याबाबत घडलेली घटना अशी की, अहिल्यानगर जिल्ह्यातील कर्जत तालुक्यातील कोरेगाव येथील श्री दत्त किराणा अँड जनरल स्टोअर्स या दुकानांमध्ये तीन तारखेला दुपारी चार वाजता रोहिणी रवींद्र शेळके या महिला व्यापारी दुकानांमध्ये होत्या. त्यावेळी दुचाकी वर दोन चोरटे तोंडाला रुमाल बांधून दुकानांमध्ये आले. पिण्याच्या पाण्याची बॉटल मागितली. पाण्याची बॉटल खरेदी करण्यासाठी चोरट्याने पन्नास रुपये दिले. महिलेने पैसे पन्नास रुपये घेऊन ते गल्ल्यात टाकून सुट्टे पैसे देत असताना चोरट्याने त्या संधीचा फायदा घेत त्यांच्या गळ्यातील सोन्याची दागिने ओरबडले आणि साथीदाराच्या गाडीवर बसून पळून गेला.

### चोरटे दुचाकीवरून पसार

ही घटना घडताच महिला दुकानदार शेळके यांनी जोरजोरात आरडा ओरड केली.नागरिक त्या ठिकाणी धावत आले मात्र तोपर्यंत चोरटे पसार झाले होते. या प्रकरणी कर्जत पोलीस स्टेशनमध्ये दोन अज्ञात चोरट्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दुकानचे चालक रवींद्र शेळके हे कर्जत येथे काही कामानिमित्त आलेले असताना ही घटना घडली.

# बकरी ईदनिमित्त शांतता समितीची बैठक

## पाथर्डी पोलिसांचा गोवंश कत्तल बंदीवर जोर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**पाथर्डी :** पाथर्डी तालुक्यात बकरी ईद सण शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरा व्हावा, यासाठी मंगळवारी सायंकाळी पाथर्डी पोलीस स्टेशन येथे मुस्लिम समाजातील प्रतिष्ठित नागरिक आणि मौलानांची शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत गोवंश जातीच्या जनावरांची कत्तल पूर्णपणे बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कुर्बानीसाठी संरक्षित जागेचा वापर करण्याचे आणि कोणत्याही समाजाच्या धार्मिक भावना दुखावणार नाही, याची खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात आले.पाथर्डी पोलीस स्टेशन येथे आयोजित या बैठकीला काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष नासिर शेख, मौलाना मन्सूर पठाण यांच्यासह मुस्लिम समाजातील अनेक प्रतिष्ठित नागरिक आणि मौलाना उपस्थित होते. पोलिस निरीक्षक मुटकुळे यांनी सांगितले की, बकरी ईद हा सण सर्वांनी मिळून आनंदाने साजरा करावा. यासाठी कोणत्याही प्रकारे सामाजिक तणाव निर्माण होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रकारच्या अनुचित प्रकाराला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.




मौलाना मन्सूर पठाण यांनी समाजातील सर्वांनी एकत्र येऊन सण साजरा करण्याचे आवाहन केले. काँग्रेस तालुकाध्यक्ष नासिर शेख यांनीही सामाजिक एकतेचा संदेश देताना सर्व समाजबांधवांना सणाच्या शुभेच्छा दिल्या. बैठकीत उपस्थित सर्वांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याची ग्वाही दिली. यावेळी सहाय्यक पोलिस निरीक्षक शिवाजी तांबे आणि गुप्तवार्ता विभागाचे नागेश वाघ हे उपस्थित होते.

# खर्डा गावात ५४४ घरकुल मंजूर : सुरवसे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** पंतप्रधान घरकुल योजनेत एवढ्या मोठ्या प्रमाणात उद्दिष्ट मिळाल्याची ही पहिलीच वेळ आहे. खर्डा येथील घरकुलांची प्रतीक्षा यादी हळूहळू कमी होत होती.

घरकुलाचा लाभ देण्याचा नेहमी प्रयत्न करणार आहे, तसेच खर्डा ग्रामपंचायत येथे प्रत्यक्ष असलेली यादीतील (ड) ५४४ घरकुलांना मंजुरी मिळाली असल्याची माहिती भाजपा जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र सुरवसे यांनी दिली. त्याचबरोबर पंतप्रधान घरकुल योजनेत घरकुलासाठी कुणीही आर्थिक व्यवहार करू नये, पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात उद्दिष्ट प्राप्त झाले असून प्रत्येक लाभार्थी कुटुंबाला प्रतीक्षा यादीप्रमाणे याचा लाभ मिळणार आहे.

तालुका स्तरावरून ग्रामपंचायतस्तरावर हे थेट उद्दिष्ट दिलेले असल्याने ग्राम पंचायतींना मिळालेल्या घरकुलांच्या उदिष्टाप्रमाणे लाभार्थ्यांना लाभ द्यावा लागणार आहे. येत्या २ दिवसात लाभार्थींच्या खात्यात पहिला हप्ता पडणार आहे.




खर्डा ग्रामपंचायत मध्ये प्रथमच ५४४ जणांना घरकुलाला मंजुरी झाल्याबद्दल देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडवणीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, यांचे खर्डा ग्रामस्था तर्फे आभार व्यक्त करण्यात आले.

# डॉ. नगरकर यांना विश्वबंधुता पुरस्कार

**जनता आवाज वृत्तसेवा**




**कर्जत :** येथील दादा पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉक्टर संजय नगरकर यांना विश्वबंधुता भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

विश्वबंधुता साहित्य परिषद पुणे, रयत शिक्षण संस्थेचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, औंध आणि काषाय प्रकाशन पुणे या संस्थांच्या संयुक्त विद्यमाने सातवा विश्वबंधुता काव्य महोत्सव नुकताच एस. एम. जोशी सभागृह, पुणे येथे संपन्न झाला. या संमेलनामध्ये रयत शिक्षण संस्थेच्या दादा पाटील महाविद्यालय, कर्जत येथील प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांना प्रतिष्ठेचा विश्वबंधुता पुरस्कार विश्वबंधुता साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्रकाश रोकडे, प्रा. चंद्रकांत वानखेडे, संगीता झिंजुरके, कॉ. अजित अभ्यंकर, प्राचार्य डॉ. अरुण आंधळे, प्रा. भारती जाधव यांच्या उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला.

या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष राजेंद्र फाळके, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य आमदार रोहितदादा पवार, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य आदींनी अभिनंदन केले आहे.

# क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्पचा उत्साही समारोप

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** शहरातील सावेडी उपनगरामध्ये गेल्या पंधरा वर्षांपासून स्नेहालयच्या उडान प्रकल्प आणि युवा सोशल सामाजिक बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित केला जाणारा 'क्रिएटिव्ह टॅलेंट समर कॅम्प' यंदाही २०२५ मध्ये उत्साहात पार पडला. सावेडी उपनगरासह शहरातील विविध भागांतील बालकांनी या ११ दिवसांच्या कॅम्पमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या समर कॅम्पचा समारोप सोहळा चेतना लॉन, छत्रपती संभाजीनगर रोड येथे मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब पवार होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आकाश त्रंबके, विजय साबळे, प्रवीण कदम, महेश सूर्यवंशी, संदीप क्षीरसागर, नितीन वावरे, गौरव राऊत, योगीराज धामणे, माजी नगरसेवक विनीत पाऊलबुद्धे, रूपालीताई वारे, भाऊसाहेब गोंधळी (अध्यक्ष, समर्पण सेवा फाउंडेशन), विनोद सापा (महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती), तन्वी मांढरे (ओम नाद संगीत विद्यालय) यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमादरम्यान बाळासाहेब देशमुख यांच्या संकल्पनेतून वृक्ष संवर्धन आणि प्लास्टिक मुक्त भारत या विषयावर आधारित 'गणपती बाप्पा मोरया' ही प्रभावी एकांकिका सादर करण्यात आली. याशिवाय, स्नेहालय संस्थेच्या विद्यार्थ्यांनी संगीता सानप यांच्या मार्गदर्शनाखाली नाट्यप्रयोगही सादर केला.



# प्राचार्यपदी डॉ. अरुण घनवट यांची नियुक्ती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** मुळा एज्युकेशन सोसायटीच्या श्री ज्ञानेश्वर महाविद्यालय, नेवासा येथील उपप्राचार्य डॉ. अरुण घनवट यांची संस्थेने प्रभारी प्राचार्यपदी नियुक्ती केली आहे. गणित विषयाचे प्राध्यापक असलेल्या डॉ. घनवट यांना ३२ वर्षांचा प्रदीर्घ अध्यापन व प्रशासकीय अनुभव असून, त्यांनी २००८ मध्ये एम.फिल. पदवी प्राप्त केली आहे.

सन १९९९ पासून अंतर्गत गुणवत्ता निर्धारण कक्षाचे प्रमुख व मार्गदर्शक म्हणून त्यांनी सोनई व नेवासा महाविद्यालयात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. २००३ मध्ये नॅकच्या राज्यस्तरीय तज्ज्ञ समितीवर सदस्य म्हणून त्यांची निवड झाली होती. त्यांनी ल्याब टू लँड, आंतरविद्यापीठ देवाण-घेवाण, कार्यशाळा, सामाजिक उपक्रम आदी नाविन्यपूर्ण उपक्रम प्रभावीपणे राबवले आहेत.

संस्थेचे सहसचिव डॉ. विनायक देशमुख यांच्या हस्ते प्राचार्यपदाचा कार्यभार त्यांच्याकडे सोपवण्यात आला. यावेळी डॉ. घनवट यांनी संस्थापक अध्यक्ष यशवंतरावजी गडाख यांचे शिक्षणविषयक विचार मार्गदर्शक मानून, "शैक्षणिक आलेख उंचावण्यासाठी सर्व सेवकांना बरोबर घेऊन सर्वतोपरी प्रयत्न करू," असे आश्वासन दिले.

# पिक कर्ज नाकारणाऱ्या बँकांवर कारवाई करा

## नेवासा आम आदमी पार्टीचा आंदोलनाचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा :** राज्य सरकारचा आदेश डावलून सिबील पाहून शेतकऱ्यांना पिक कर्ज नाकारुन अडवणूक करणाऱ्या तालुक्यातील राष्ट्रीयकृत बँकांवर कठोर कारवाई न केल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा आम आदमी पार्टीने दिला आहे.

यासंदर्भात आम आदमी पार्टीने नेवासा तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पिक कर्जाची मागणी करणाऱ्या शेतकऱ्यांची सिबिल स्कोअरच्या नावाखाली राष्ट्रीकृत बँकांनी अडवणूक करु नये, अशी तंबी राज्य सरकारने दिली असून तसे करणाऱ्या बँकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचा इशाराही देण्यात आला आहे. मात्र तरीही तालुक्यातील बहुतांश राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांतून सिबील स्कोअरचे कारण देऊन शेतकऱ्यांना सर्रास पिक कर्ज नाकारण्यात येत असल्याच्या गंभीर तक्रारी वाढल्या आहेत. ही बाब गंभीर असून सरकारी आदेशाची पायमल्ली करणारी आहे.

पिक कर्ज मिळणे हा शेतकऱ्यांचा हक्क असताना त्यांना यापासून वंचित ठेवण्याचा हा अन्याय्य प्रकार आहे. राष्ट्रीकृत बँका पिक कर्ज नाकारत असल्याने हतबल बनलेल्या शेतकऱ्यांवर नाईलाजाने खाजगी सावकारांचे उंबरठे झिजवण्याची दुर्दैवी वेळ ओढवली आहे. अशीच परिस्थिती राहिल्यास तालुक्यातील बहुतांश शेतकरी खाजगी सावकारांच्या दुष्टचक्रात गुरफटून भविष्यात त्यांच्यावर कर्जबाजारीपणापायी आत्महत्येची दुर्दैवी वेळ ओढवण्याची भीती आपने व्यक्त केली आहे.

येत्या आठ दिवसांत तालुक्यातील राष्ट्रीयकृत बँकांच्या शाखांतून शेतकऱ्यांचे सी बील न पाहता त्यांना पिक कर्जाचे वितरण सुरळीत न झाल्यास संबंधित बँकांच्या शाखांमध्ये संबंधित वंचित शेतकऱ्यांसह जाऊन तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

### यांनी दिला आंदोलनाचा इशारा

नेवासा आम आदमी पार्टीचे तालुकाध्यक्ष अॅड. सादिक शिलेदार, सचिव प्रवीण तिरोडकर, उपाध्यक्ष देवराम सरोदे, अण्णासाहेब लोंढे, किरण भालेराव, शहराध्यक्ष संदीप आलवणे, अल्पसंख्यांक आघाडीचे सलीम सय्यद, विठ्ठल मैंदाड, करीम सय्यद, विठ्ठल चांडे, समित पटारे, मुन्नाभाई आतार, राजू महानोर आदींच्या सह्या आहेत. नायब तहसीलदार चांगदेव बोरुडे यांनी निवेदन स्विकारले.



## संपादकीय

### मोदींचा सल्ला मानवेल?

'काँग्रेसमुक्त भारत' करताना भाजपने आपल्या पक्षाला 'काँग्रेसयुक्त भाजप' केले, की काय अशी शंका यावी अशी स्थिती आहे. भाजपची पहिली, दुसरी त्यागी पिढी आता संपली आहे. भाजपच्या नेत्यांनाही आता परिवारवाद सोडवेनासा झाला आहे. अनेक राज्यात एकाच घरात दोन-दोन, तीन-तीन पदे आणि कार्यकर्ते मात्र सतरंज्या उचलायला अशी स्थिती आहे. नितीन गडकरी यांच्यासारखे काही सन्माननीय अपवाद वगळले, तर भाजपच्या नेत्यांतही कुटुंबवाद रुजला आहे. रुळला आहे. भाजपने घरोबा केलेले अनेक मित्रपक्ष तर कुटुंबाचेच राजकारण करणारे होते. अजूनही आहेत. राजकुमार, युवराज म्हणून मोदी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राहुल गांधी यांची खिल्ली उडवत असताना भाजपला तरी कुठे कुटुंबाच्या बाहेर पदे देण्याचे सुचते ? काही अपवाद येथेही आहेत. नाही असे नाही. मोदी जेव्हा इतर पक्षांवर घराणेशाही, कुटुंब कबिल्यांवरून टीका करताना एक बोट दाखवतात, तेव्हा चार बोटे आपल्याकडे असतात, याचा विसर त्यांना पडलेला असतो. कोणताही राजकीय पक्ष आता घराणेशाही, परिवारवादापासून दूर नाही. एखाददुसरा अपवाद इथेही आला. या पार्श्वभूमीवर मोदी यांनी बिहार विधानसभेच्या अगोदर केलेल्या दोन दिवसीय बिहार दौऱ्यात पुन्हा एकदा परिवारवादाला लक्ष्य केले आणि भाजपच्या कार्यकर्त्यांना त्याग करण्याचे आवाहन केले. कार्यकर्त्यांनी त्याग करायचा आणि नेत्यांनी घरातच पदे वाटून घ्यायचे असे चित्र असल्यावर कार्यकर्ते तरी कसा प्रतिसाद देणार, हा प्रश्नच आहे. आचार्य विनोबा भावे यांच्याकडे एक व्यक्ती गूळ न खाण्यासाठी उपाय काय अशी विचारणा करायला गेले. तेव्हा त्यांनी लगेच त्याला सल्ला दिला नाही. अगोदर स्वतः गूळ खाणे सोडले आणि नंतर त्याला गूळ न खाण्याचा सल्ला दिला. आधी स्वतः एखादी गोष्ट आचरणात आणून नंतर ती अनुकरण करायला सांगितली, तर तिचे अनुकरण होते. अन्यथा, लोक ती गांभीर्याने घेत नाहीत. देशभरात झालेल्या लोकसभा, विधानसभा, राज्यसभेला उमेदवाऱ्या देताना भाजपने किती परिवादातील व्यक्तींना तिकीटे दिली, याचा अहवाल एका संस्थेने दिला होता. त्यामुळे इतरांना सल्ला देताना किंवा त्याग करायला सांगताना त्याचे आचरण अगोदर वरिष्ठांनी केले पाहिजे, हा दंडक घालून घेतला पाहिजे. मोदी आणि अमित शाह यांच्या काळात भाजप निवडणूक राजकारणाचा एक धोरणात्मक डाव खेळत आहे. जनतेला असा संदेश देण्याचा प्रयत्न केला जात आहे, की काँग्रेस आता कमकुवत होत आहे आणि तिचे राजकीय जहाज आता बुडत आहे. राजकीय भविष्याच्या शोधात काँग्रेस नेते भाजपकडे धावत आहेत. पाटणा येथील बिहार भाजप कार्यालयात मोदी यांनी राज्यातील नेत्यांशी सुमारे ७० मिनिटे संवाद साधला आणि आगामी बिहार निवडणुकीसाठी विजयासाठी कानमंत्र दिला. बिहार भाजपच्या नेत्यांशी बोलताना मोदी म्हणाले, की पक्ष आज चार पिढ्यांनंतर या स्थानावर पोहोचला आहे. तो जगातील सर्वात मोठा पक्ष बनला आहे. राजकारणात घराणेशाही नसावी... जमीनदारी व्यवस्था नसावी... असे होऊ नये, की तुम्ही नसाल तर आमचा मुलगा-मुलगी... असे होऊ नये. कार्यकर्ते कठोर परिश्रम का करतो? त्याला त्याच्या कष्टाचे फळ का मिळू नये? असे सवाल मोदी यांनी केले. त्यावर कार्यकर्त्यांच्या टाळ्याही मिळाल्या; परंतु खरेच तसे होते का, मोदी यांच्या गेल्या ११ वर्षाच्या सत्तेत असे घडले का, या प्रश्नांची उत्तरे नकारार्थी मिळतात. बिहार विधानसभेच्या निवडणुकीत उमेदवारी वाटपात काही वेगळा निर्णय घेण्याच्या शक्यतेने किंवा मित्रपक्षांवरही घराणेशाहीपासून दूर राहण्यासाठी तर मोदी यांनी सावध केले नाही ना, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभावीक आहे. तिकीट कापले गेले किंवा कुटुंबातील सदस्यांना तिकीट मिळाले नाही, तर असंतोष निर्माण होईल हे गृहीत धरून अशा नेत्यांना मोदी यांनी इशारा दिला असावा. मोदी यांनी भाजप कार्यकर्त्यांना धीर धरण्याचा आणि कठोर परश्रम करण्याचा सल्ला दिला आहे. ते म्हणाले, की जे निवडणुका आल्या की दुसऱ्या पक्षात जातात आणि नंतर स्वतःच्या पक्षात परततात अशा लोकांचे महत्त्व कमी होते. पक्षात सर्वात मोठी संपत्ती म्हणजे धीर. जर तुम्ही धीर धरलात तर तुम्हाला आदर मिळेल. मोदी यांनी भाजपच्या अशा दलबदलू संभाव्य नेत्यांना कडक इशारा दिला आहे. तुम्ही कुठेही गेलात, तर की तुम्ही कुठेही नसाल. प्रत्येक नेता नितीशकुमार नसतो. आता तेही पुन्हा पुन्हा सांगून थकत नाही, की ते कुठेही जाणार नाहीत. भाजप नेत्यांना सल्ला देऊन मोदी यांनी लालू यादव यांच्या कुटुंबाला लक्ष्य केले आहे. तेजस्वी यादव आणि तेज प्रताप आमदार आहेत, राबडी देवी बिहारच्या मुख्यमंत्री राहिल्या आहेत. मीसा भारती राज्यसभेच्या सदस्य आहेत. रोहिणी आचार्य निवडणूक हरल्या नसत्या, तर त्याही लोकसभा खासदार झाल्या असत्या. गेल्या निवडणुकीत नितीश कुमार यांनी लालू यादव यांच्यावर घराणेशाहीच्या राजकारणाचा हल्ला चढवला होता. नितीश कुमार यांनी कडवट शब्दांत सांगितले, की विकासाच्या नावाखाली लालू यादव यांनी काय केले, त्यांनी फक्त मुले जन्माला घातली आणि त्यांना राजकारणात आणले.

लालू प्रसाद यादव यांच्या परिवारवाद आणि घराणेशाहीच्या राजकारणावर टीका मोदी यांनी केली; परंतु असेच नेते त्यांच्या पक्षातही आहेत आणि मित्रपक्षांचे राजकारण घराणेशाही आणि कुटुंबकल्याणाचे राजकारण करतात. मोदींचे हनुमान म्हणून ओळखले जाणारे चिराग पासवान हेदेखील कुटुंब राजकारणाचे उत्पादन आहे. पूर्वी त्यांचे वडील, त्यांचे काका आणि चुलत भाऊदेखील खासदार होते. आताही चिराग पासवान यांचे मेहुणे लोकसभा खासदार आहेत. बिहार भाजपमध्येच सी. पी ठाकूर यांचा मुलगा विवेक ठाकूरसारख्या अनेक नेत्यांची मुले खासदार आणि आमदार आहेत. नितीश कुमार यांचा मुलगा निशांत कुमार यांनाही राजकारणात आणण्याची जोरदार मागणी होत आहे. 'लोकनीती सीएसडीएस'ने सर्वेक्षणात भाजपमध्ये घराणेशाही आहे, असे आढळले होते. भाजप हा घराणेशाहीपासून मुक्त पक्ष आहे असे फार कमी मतदारांना वाटत होते. भाजप नेते विनय सहस्रबुद्धे यांनी एका लेखात भाजपच्या घराणेशाहीचे समर्थन केले होते. त्यांनी असा युक्तिवाद केला होता, की पक्षात किंवा राजकारणात पुढच्या पिढीच्या नेत्याला बढती देणे ही एक गोष्ट आहे आणि कुटुंबाने पक्ष ताब्यात घेणे ही दुसरी गोष्ट आहे. भाजप नेते सापेक्ष स्थिती राजनाथ सिंह, गोपीनाथ मुंडे, प्रमोद महाजन, सुषमा स्वराज, कल्याण सिंह, नथुराम मिर्धा, वसुंधरा राजे, ज्योतिरादित्य शिंदे, राधाकृष्ण विखे पाटील, मधुकर पिचड, एकनाथ खडसे, पांडुरंग फुडकर, रावसाहेब दानवे अशा कितीतरी नेत्यांच्या कुटुंबातील अनेक सदस्य राजकारणात आहेत. भाजपच्या मित्रपक्षांमध्येही घराणेशाही आहे. भाजपने काश्मीरमध्ये ज्या 'पीडीपी'सोबत सरकार स्थापन केले होते, त्या 'पीडीपी'च्या नेत्या मेहबूबा मुफ्ती यांना त्यांचे वडील जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री मुफ्ती मोहम्मद सईद यांच्याकडून राजकारणाचा वारसा मिळाला. पंजाबमध्ये भाजपची अकाली दलाशी युती होती, जिथे घराणेशाही प्रभावी होती. भाजपने शरद पवार यांचे पुतणे अजित पवार यांना महाराष्ट्रात उपमुख्यमंत्री बनवले आहे. यापूर्वी मोदी हे पवार कुटुंबावर घराणेशाहीला प्रोत्साहन देण्याचा आरोप करत होते. कर्नाटकमध्ये निवडणूक लढवणाऱ्या धर्मनिरपेक्ष जनता दलाने माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे पुत्र आणि राज्याचे माजी मुख्यमंत्री एचडी कुमारस्वामी यांना उमेदवारी दिली होती. कर्नाटक सरकारचे माजी मंत्री एचडी रेवन्ना यांचे पुत्र आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू प्रज्वल रेवन्ना हेदेखील धर्मनिरपेक्ष जनता दलाकडून उमेदवार होते. झारखंड मुक्ती मोर्चामधील घराणेशाही झारखंड मुक्ती मोर्चाच्या आमदार आणि झारखंड मुक्ती मोर्चाच्या अध्यक्ष शिबू सोरेन यांच्या सून सीता सोरेन लोकसभा निवडणुकीपूर्वी भाजपमध्ये सामील झाल्या. ही परिस्थिती मोदी आता कुणाकुणाला राजकीय त्यागाचा सल्ला देतात, हे पाहायचे.

# चीन-पाक कॉरिडॉरमध्ये अफगाणचा प्रवेश

**वेध**
**– शंतनु चिंचाळकर**

चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर या भारतासाठी डोकेदुखी ठरू पाहणाऱ्या भागीदारीत आता अफगाणिस्तानची भर पडली आहे. चीन हा कॉरिडॉर त्रिपक्षीय विकास योजना म्हणून भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा त्यामागील छुपा अजेंडा आहे. हा कॉरिडॉर भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत.




चीनने व्यापारवृद्धीसाठी, दक्षिण आशियाई देशांना अधिक जवळ आणण्यासाठी आणि पाकिस्तानमधील पायाभूत सुविधा सुधारण्यासाठी एक मोठा द्विपक्षीय प्रकल्प राबवला आहे. २०१५ मध्ये सुरू झालेला हा प्रकल्प चीन - पाक इकॉनॉमिक कॉरिडॉर म्हणून प्रसिद्ध असा हा पायाभूत सुविधा प्रकल्प आहे. पाकिस्तानच्या पायाभूत सुविधांचा विकास करताना चीनची ऊर्जा आयात आणि व्यापार वाढवणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. यामध्ये ग्वादर आणि कराचीमधील बंदरांना उत्तर पाकिस्तान आणि चीनच्या शिनजियांग प्रदेशाशी जोडणारे आधुनिक वाहतूक नेटवर्क समाविष्ट आहे. बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह अंतर्गत या कॉरिडॉरमध्ये चीनने सुमारे ६५ अब्ज डॉलर्सची गुंतवणूक केली आहे. ही गुंतवणूक प्रामुख्याने ऊर्जा प्रकल्पांसह पायाभूत सुविधांच्या विकासावर केंद्रित आहे. याचा मोठा भाग वीज निर्मितीकडे जातो. २०२१ मध्ये तालिबानने अफगाणिस्तानवर पुन्हा नियंत्रण मिळवल्यानंतर २०२५ पर्यंत इतर सर्व देशांप्रमाणे चीनने पुनर्स्थापित इस्लामिक अमिरातीला मान्यता दिली नाही, परंतु देशात त्यांच्या दूतावासाला काम करण्याची परवानगी दिली. मान्यता नसतानाही चीन तालिबान सरकारशी व्यापार, गुंतवणूक आणि मदतीच्या मुद्द्यांवर वाटाघाटी करतो. अफगाणिस्तानच्या खाण क्षेत्रातील सर्वात मोठे गुंतवणूकदार म्हणजे उझबेकिस्तान, तुर्की, चीन आणि इराणमधील कंपन्या; ज्यांनी तेल आणि वायू, सिमेंट प्रकल्प आणि तांबे, सोने आणि लोखंडाच्या खाणींमध्ये गुंतवणूक केली आहे. अफगाणिस्तानमध्ये तेलाचे साठेदेखील आहेत. विशेषतः उत्तर अफगाणिस्तानमध्ये, विशेषतः बल्ख आणि जाव्झान प्रांतांमध्ये अंदाजे १.८ अब्ज बॅरल तेल आहे, चीनची या तेलसाठ्यांवर आणि खाणींवर नजर आहे. या दृष्टीने पाऊल टाकत चीनने अफगाणिस्तानला चीन-पाक इकॉनॉमिक कॉरिडॉरमध्ये सामील करून घ्यायचा निर्णय घेतला आहे.

समुद्र आणि जमिनीवर आधारित चीनच्या कॉरिडॉरचा मुख्य उद्देश मध्यपूर्वेतून चीनच्या ऊर्जाआयातीचा मार्ग सुरक्षित आणि कमी अंतराचा करणे हा आहे. मलेशिया आणि इंडोनेशियादरम्यान मलाक्का सामुद्रधुनीतून जाणारा विद्यमान मार्ग युद्धाच्या प्रसंगी बंद होऊ शकतो. त्यामुळे चीनच्या ऊर्जा-अवलंबित अर्थव्यवस्थेला धोका निर्माण होऊ शकतो. पाकिस्तान आणि चीनने चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारित करण्यास सहमती दर्शवली आहे. तिन्ही राष्ट्रांमधील त्रिपक्षीय सहकार्य अधिक दृढ करण्याचे हे प्रयत्न असल्याचे चीन भासवत असला तरी भारताशी असलेले वैर आणि विस्तारवाद हा चीनचा छुपा अजेंडा आहे. चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा भारताच्या हद्दीत येणाऱ्या पाकव्याप्त काश्मीरमधून जात असल्याने भारतासाठी सार्वभौमत्व आणि सुरक्षेचे प्रश्न उपस्थित झाले आहेत. सीपीईसीचे काम भारताच्या सहभागाशिवाय प्रगतीपथावर आहे, जे गंभीर चिंतेचा विषय बनले आहे. चीनच्या पथ्यावर पडलेली आणखी एक घटना म्हणजे अलिकडच्या एका अहवालात पाकिस्तानने त्याच्या प्रादेशिक पाण्यात मोठ्या प्रमाणात तेल आणि वायूचे साठे शोधले असल्याचे सूचित केले आहे. हे जगातील सर्वात मोठ्या साठ्यांपैकी एक असू शकतात. युनायटेड स्टेट्स एनर्जी इन्फॉर्मेशन ॲडमिनिस्ट्रेशनच्या मते पाकिस्तानकडे नऊ अब्ज बॅरलपेक्षा जास्त पेट्रोलियम तेल आणि १०५ ट्रिलियन घनफूट नैसर्गिक वायूचे साठे आहेत. हे लक्षात घेता भारताला या कॉरिडॉर त्रिकुटापासून सावध रहावे लागेल.

तालिबानच्या नेतृत्वाखालील इस्लामिक अमिरात ऑफ अफगाणिस्तान आता सत्तेमध्ये चौथे वर्ष पूर्ण करण्याच्या तयारीत आहे. गेल्या चार वर्षांमध्ये या राजवटीपर्यंत भारताची पोहोच हळूहळू वाढत गेली. आता ती अधिक थेट पण सावध व्यावहारिक सहभागामध्ये रूपांतरित झाली आहे. परराष्ट्रमंत्री डॉ. एस. जयशंकर आणि आयईएचे अंतरिम परराष्ट्र मंत्री अमीर खान मुत्ताकी यांच्यातील अलिकडच्या फोनकॉलने या भागीदारीतील एक महत्त्वाचा टप्पा गाठला. भारत-अफगाणदरम्यानचे हे व्यापारी संबंध चीन आणि पाकिस्तानला सलत आहेत. भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा निषेध केल्याबद्दल मुत्ताकी यांचे आभार मानले आणि दोन्ही देशांमध्ये अविश्वास निर्माण करण्याच्या प्रयत्नांवर विश्वास न ठेवल्याबद्दल कौतुक केले. याला पाकिस्तानने केलेल्या दिशाभूल करणाऱ्या दाव्यांचा अप्रत्यक्ष संदर्भ आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने तालिबानला मानवतावादी आणि विकास सहकार्य हळूहळू वाढवण्याचे वचन दिले आहे.

या वर्षी जानेवारीमध्ये परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी दुबईमध्ये मुत्ताकी यांची भेट घेतली. ही दोन्ही बाजूंमधील सर्वोच्चस्तरीय बैठक होती. डिसेंबर २०२४ मध्ये हल्ले आणि प्रतिहल्ल्यांनंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील संबंध बिघडल्यानंतर ही बैठक होत आहे. काबूलमधील पाकिस्तानचा प्रभाव कमी झाल्यामुळे भारताला आपला सहभाग वाढवण्यासाठी आणि या प्रदेशात आपले धोरणात्मक आणि सुरक्षा हितसंबंध अधिक चांगल्या प्रकारे सुरक्षित करण्याची संधी मिळाली. व्यापारासाठी अफगाणिस्तानच्या चाबहार बंदराचे महत्त्व, अफगाणिस्तानला मानवतावादी मदत पोहोचवणे आणि काबूलला इस्लामाबादवरील अत्यधिक अवलंबित्वातून मुक्त करणे यानिमित्ताने भारताने सहकार्याचे एक पर्व सुरु केले. आता भारताने या बाबींवर भर देऊन अफगाणिस्तानशी व्यापार संबंध बळकट करण्याची आवश्यकता आहे. अर्थात असे असले तरी, या प्रदेशातील इतर देश, खास करून चीन, तालिबान आणि अफगाणिस्तानशी संबंध प्रस्थापित करण्याकामी अधिक सक्रिय आहे. रशियाने अलिकडेच तालिबानला दहशतवादी संघटनांच्या यादीतून काढून टाकले आहे. इराण आणि मध्य आशियाई प्रजासत्ताक, जसे की कझाकस्तान, उझबेकिस्तान, तुर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान यांनीही अफगाणिस्तानशी संपर्क वाढवला आहे. तालिबानदेखील या घडामोडींचा फायदा घेत आहे, परस्पर हितसंबंधांवर आधारित तटस्थ परराष्ट्र धोरणाचा पुनरुच्चार करत आहे.

चीन आपला आर्थिक कॉरिडॉर नजरेसमोर ठेऊन पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यामधील संबंध सुधारण्यासाठी मध्यस्थ म्हणून भूमिका पार पाडत आहे. म्हणूनच दोन पारंपरिक शत्रूंशी अफगाणिस्तानच्या वाढत्या जवळीकीकडे भारताला काटेकोर लक्ष द्यावे लागणार आहे. गेल्या काही दिवसांमध्ये भारताने अफगाणशी संपर्क वाढवला आहे. २७ एप्रिल रोजी परराष्ट्र मंत्रालयाच्या संयुक्त सचिवांच्या नेतृत्वाखालील भारतीय शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीनंतर मुत्ताकी पाकिस्तान आणि चीनशीही संवाद साधत आहेत. १० मे रोजी काबूलमध्ये पाकिस्तान आणि चीनच्या विशेष प्रतिनिधींच्या बैठकीनंतर पाकिस्तानचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्रमंत्री मोहम्मद इशाक दार आणि मुत्ताकी यांनी २०-२१ मे रोजी चीनचे परराष्ट्रमंत्री वांग यी यांच्याशी त्रिपक्षीय सल्लामसलत करण्यासाठी चीनमध्ये भेट घेतली. यावेळी परस्पर हितसंबंध आणि चांगल्या शेजाराच्या आधारावर संबंध विकसित करण्याच्या वचनबद्धतेचा तिन्ही बाजूंनी पुनरुच्चार केला. त्यांनी आर्थिक तसेच संपर्क राखण्याच्या आघाड्यांवर सहकार्य वाढवण्याचे ठरवले आणि चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर अफगाणिस्तानपर्यंत विस्तारण्यास सहमती दर्शवली. भारताच्या दृष्टीने या निर्णयाला महत्व आहे. ही उपद्रवी राष्ट्रे एकत्र येत असल्याने अफगाणिस्तानशी असलेले संबंध वाढवण्याच्या दृष्टीने भारताची कसोटी लागणार आहे.

गेल्या साडेतीन वर्षांमध्ये अफगाणिस्तान आणि पाकिस्तानमधील संबंध लक्षणीयरीत्या बिघडले आहेत. मात्र तरीही दोन्ही बाजू प्रश्न सोडवण्याचा आणि एकमेकांशी पुन्हा संपर्क प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहेत. भारत आणि पाकिस्तानमधील संघर्षानंतर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानला पुन्हा आपल्या हद्दीत समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न भारतासाठी अडचणीचा ठरू शकतो. भारताशी प्रस्थापित केलेले चांगले संबंध अफगाणिस्तानला पाकिस्तानपासून स्वावलंबन मिळवून देतात, परंतु तालिबानशी असलेले संबंध आपल्याला हवे असलेले फायदे देऊ शकतात का, यावर भारताची कडक नजर असणे आवश्यक आहे. या आर्थिक कॉरिडॉरची भारताच्या दृष्टीने जमेची बाजू म्हणजे पाकिस्तानी आणि चिनी निवेदनांमध्ये सर्व प्रकारच्या दहशतवादाला विरोध आणि त्याचा सामना करण्याची त्यांची वचनबद्धता नमूद करण्यात आली. मुत्ताकी यांनी वांग यी यांच्यासोबतच्या द्विपक्षीय बैठकीत अफगाणिस्तानची भूमी त्यांच्या कोणत्याही शेजारी देशांविरुद्ध वापरण्याची परवानगी दिली जाणार नाही, असेही वचन दिले. भारताला अफगाणिस्तानशी संबंध वाढवताना अल कायदासारख्या गटांच्या उपस्थितीमुळे निर्माण होणाऱ्या धोक्याची जाणीवदेखील असली पाहिजे. अफगाणिस्तानमध्ये अजूनही अनेक दहशतवादी संघटना कार्यरत आहेत. त्यांचे भारताशी वैर जगजाहीर आहे. यामुळे नवी दिल्लीला मोठ्या धोक्यापासून सावध रहावे लागणार आहे.

# बनावट ॲप घोटाळ्यातील दोषींवर गुन्हे दाखल करा

## संभाजी माळवदे यांची पोलीस अधीक्षक यांच्याकडे मागणी

**जनता आवाज वृत्तसेवा**

**नेवासा** : शनिशिंगणापूर येथील बनावट ॲपच्या माध्यमातून केलेल्या करोडो रुपयाच्या घोटाळ्याची तातडीने चौकशी करून यात सामील असणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याची मागणी अहिल्यानगरचे पोलीस अधीक्षक यांच्याकडे करण्यात आली.

> जोपर्यंत या बनावट ॲप तयार करणाऱ्याचा छडा लागत नाही. दोषीवर गुन्हे दाखल होत नाही. तसेच अपहार केलेला पैसा परत देवस्थान तिजोरीत जमा होत नाही, तोपर्यंत स्वस्थ बसनार नाही, याविरोधात आणखी तीव्र लढा उभारणार आहे.
>
> **–संभाजी माळवदे,** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी

सविस्तर वृत्त असे की, शनैश्वर देवस्थान शनीशिंगणापूरमध्ये काही कर्मचाऱ्यांनी देवस्थानच्या अधिकृत ॲपच्या ऐवजी बनावट ॲप तयार करून ऑनलाईन पूजेच्या माध्यमातून करोडो रुपयाचा भ्रष्टाचार केला आहे.

सदर ॲपचे दोन लाखाच्यावर सदस्य असून त्यांची सदस्यत्व फी प्रति व्यक्ती अठराशे लावली आहे. तसेच इतर पूजेच्या साहित्याची वेगळीच फी लावण्यात आली आहे. अशा प्रकारे जवळ जवळ पन्नास कोटी रुपये शनिभक्तांकडून या बनावट ॲपच्या माध्यमातून जमा करण्यात आले.

परंतु, हा निधी देवस्थान तिजोरीत जमा न होता तो बनावट ॲपच्या माध्यमातून खाजगी कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा झाला. ॲपच्या माध्यमातून करोडोचा निधी कर्मचाऱ्यांनी हडप केला. यामुळे देवस्थानच्या उत्पन्नात मोठी घट झाली. देवस्थानची करोडोची फसवणूक करण्यात आली.

सकृत दर्शनी मोठा भ्रष्टाचार यात झालेला दिसतो. तसेच ऑनलाईन पूजेच्या नावाखाली शनीभक्तांची मोठी लूट या कर्मचाऱ्यांनी केलेली दिसून येते.


सदरची रक्कम ही पन्नास कोटीच्या पुढे जात असून ही मोठी गंभीर बाब दिसून येत आहे. याआगोदर देवस्थान प्रशासनाला याबाबत विचारणा केली असता प्रशासन यावर बोलायला तयार नाही.

याबाबत प्रशासनाला लेखी खुलासा देखील मागितला आहे व आंदोलनाचा इशारा देखील देण्यात आला आहे. आज अहिल्यानगर येथे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे, काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे हरीश चक्रनारायण, छावा संघटनेचे रावसाहेब काळे यांनी पोलीस अधीक्षक यांची भेट घेत या घोटाळ्याची सखोल चौकशी करून गुन्हे दाखल करत कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसे लेखी निवेदन पोलीस अधीक्षक यांना देण्यात आले.

# अय्यप्पा मंदिराचा १० जूनला प्रतीस्थापना महोत्सव

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : नगर शहरातील सावेडीतील श्री आयप्पा मंदिराचा ३१ वा प्रतिस्थापना महोत्सव रविवार, दि. १० जून रोजी साजरा होत असून त्यानिम्मित विविध कार्यक्रमाचे आयोजन गुरुवार्याच्या उपस्थिती करण्यात आले आहे, अशी माहिती अध्यक्ष के. के. शेट्टी यांनी दिली.



सावेडीतील अय्यप्पा मंदिर हे अत्यंत आकर्षक असून यामध्ये अय्यप्पा स्वामी,गणपती व सरस्वतीची स्वतंत्र मंदिरे आहे. यास ३० वर्षे पूर्ण झाली असून वार्षिक वर्धापन दिनानिमीत पहाटे पासूनच विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहे. यामध्ये महागणपती हवन, उषा पूजा, महामृत्युंजय हवन, कलश पूजा, कलश अभिषेकम, उच्च पूजा तर संध्याकाळी भगवती सेवा, पुष्पा अभिषेक, अथर्झापूजा, हरी वरासम होऊन महाप्रसादाने सांगता होणार आहे.

सर्व कार्यक्रमांना भाविकांनी उपस्थित राहावे. तसेच श्री आयप्पा सेवा समितीच्या कलश पुजेस ज्यांना सहभागी व्हायचे असेल त्यांनी व अन्नदानासाठी मंदिरात संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# पोपटराव साठे समाजरत्न पुरस्काराने सन्मानित

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर** : सार्वजनिक बांधकाम विभागातील सेवानिवृत्त कर्मचारी पोपटराव धोंडीबा साठे यांना छत्रपती संभाजी महाराज राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निमगाव वाघा येथे स्व. पै. किसनराव डोंगरे बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या पहिल्या ग्रामीण मराठी साहित्य संमेलनात खासदार निलेश लंके यांच्या हस्ते साठे यांना पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी संमेलनाच्या अध्यक्षा सरोज आल्हाट, साहित्यिक भारत सातपुते, संमेलनाचे संयोजक व ग्रामपंचायत सदस्य नाना डोंगरे, कवी संमेलनाचे अध्यक्ष रज्जाक शेख, बाळासाहेब देशमुख, ॲड. रामदास सुर्यवंधी आदी मान्यवर उपस्थित होते. पोपटराव साठे मागील अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात सक्रीय योगदान देत आहे.

पान १ वरून पान १ वरून पान १ वरून

## माजी मंत्री थोरातांमुळेच संगमनेरात जलसमृद्धी

भागाचा कायमचा पाणी प्रश्न सोडवावा. याकरता निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. डावा आणि उजवा कालवा पूर्ण करण्यासाठी त्यांनी आमदारकी आणि मंत्रीपद पणाला लावले. मोठ्या कष्टातून हे ऐतिहासिक काम पूर्ण झाले आहे.

## नागरिकांना तातडीच्या सेवा द्या

येणाऱ्या अडचणी व पुढील उपाययोजना देखील मांडल्या. जिल्हाधिकारी आशिया यांनी स्पष्ट निर्देश दिले की, कामांमध्ये पारदर्शकता आणि गती येणे आवश्यक आहे. नागरिकांची सेवा हीच आपली सर्वोच्च प्राधान्यक्रम असावी. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी पूर्ण निष्ठेने पार पाडावी. या बैठकित उपायुक्त विजय मुंढे, डॉ. संतोष टेंगळे, सहायक आयुक्त सपना वसावा, निखिल फराटे, जल अभियंता परिमल निकम, आस्थापणा विभाग प्रमुख मेहेर लहारे, शहर अभियंता मनोज पारखे, श्रीकांत निंबाळकर, अतिक्रमण विभाग प्रमुख सुरेश इथापे, घनकचरा विभाग प्रमुख अशोक साबळे, प्रसिध्दी अधिकारी शशिकांत नजन, संगणक विभाग प्रमुख अंबादास साळी, सर्व प्रभाग अधिकारी आणि विभाग प्रमुख आदी उपस्थित होते.

## अजित पवारांच्याच पक्षात गटबाजी

असल्याचे स्पष्ट होते. एकनाथ शिंदेंचा पाहा किंवा अजित पवारांचा पक्ष पाहा. त्यांना त्यांच्याच पक्षात काय सुरू आहे हे कळत नसेल तर आम्ही काय वक्तव्य करणार? असेही रोहित पवार यावेळी बोलताना म्हणाले. उल्लेखनीय बाब म्हणजे सध्या राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या एकीकरणाचे वारे वाहत आहेत. शरद पवारांनी यासंबंधीचा निर्णय खासदार सुप्रिया सुळे यांच्यावर सोपवला आहे. रोहित पवारांनी नुकतेच या मुद्यावर भाष्य केले होते. शरद पवार जेव्हा काही बोलतात तेव्हा त्याचा खूप खोल अर्थ असतो. कधीकधी त्यांच्या म्हणण्यापेक्षा काहीतरी उलट घडत असते. शरद पवार लवकरच महाराष्ट्राच्या जनतेच्या हिताचा निर्णय घेतील. जेव्हा अजित पवारांचा गट वेगळा होऊन भाजपशी युती करत होता तेव्हा शरद पवारांच्या गटाने असे करणे चुकीचे असल्याचे म्हटले होते. कारण त्यांचे भाजपशी वैचारिक मतभेद आहेत. आता जर शरद पवारांचा पक्ष अजित पवारांच्या पक्षात सामील होऊन भाजपशी युती करत असेल तर ते आश्चर्यकारक ठरेल, असे ते म्हणाले होते.

## विवेक कोल्हे यांच्यामुळे हाडोळ रस्ता सुरू : वाकचौरे

रस्त्याच्या कामासाठी पाठपुरावा केला. या मागणीची दखल घेत विवेक कोल्हे यांनी वरिष्ठ प्रशासन पातळीवर सातत्याने पाठपुरावा करत रस्ता खुला करण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले. त्यांच्या या प्रयत्नांना यश येत, अखेर अत्यंत आवश्यक असलेला हा रस्ता सुरु करण्यात आला. या कामात कोपरगावचे तहसीलदार महेश सावंत, मंडल अधिकारी अनिल मांढरे व तलाठी सय्यद यांनी प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेत, शिस्तबद्ध पद्धतीने काम पार पाडले. मंडल अधिकारी व तलाठी यांनी प्रत्यक्ष ठिकाणी उपस्थित राहून उशिरापर्यंत रस्त्याचे काम पूर्णत्वास नेले. या रस्त्यामुळे स्थानिक नागरिक व शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण असून, त्यांनी विवेक कोल्हे यांचे आभार मानले आहेत.

## अतिवृष्टीग्रस्तांना आपत्ती व्यवस्थापनातून निधी द्या

आहेत. स्मशानभूमीशेजारील रस्ता व सीडी वर्क, अस्तगांव गावठाण ते तरोडी रस्ता दुरूस्ती, गावठाण ते गाढवे वस्ती रस्ता दुरूस्ती. स्मशानभुमी दुरूस्ती व सुशोभिकरण, खडकी ते जाधव मळा रस्ता व सीडी वर्क, खडकी सोसायटी ते नगर दौंड महामार्ग रस्त्याचे काँक्रीटीकरण. वाळकी ते गुंडेगाव रस्ता व सीडी वर्क, गावठाण ते अमरधाम रस्ता दुरूस्ती, जुंदरे मळा रस्ता दुरूस्ती, बोठे वस्ती, जुंदरे वस्ती, अमरधाम जवळील बंधारे दुरूस्ती. वडवस्ती ते खैरे वस्ती रस्ता दुरूस्ती, नवीन खडकवाडी पूल दुरूस्ती व सीडी वर्क, गावठाण ते घुले वस्ती रस्ता दुरूस्ती. गावठाण ते मेहेत्रे वस्ती रस्ता व ३ ठिकाणी सीडी वर्क, जाधववाडी रस्त्यावर २ ठिकाणी सीडी वर्क, दरोडी मळा, थोरात वस्ती, देशमुख मळा रस्ते दुरूस्ती. सोनेवाडी-जाधववाडी रस्त्यावरील पुल, सीडी वर्क, बोगरे हॉस्पिटल ते कुबाडे मळा रस्त्यावरील सीडी वर्क, दरेवस्ती, पाटील मळा, गोपळ वस्ती, दळवी वस्ती येथे सीडी वर्क.

हे दैनिक जनता आवाज मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक अजित रमेश मोरे यांनी जनता आवाज प्रेस गट नं. २५/१/२/३, कोल्हार बु., ता. राहाता, जि. अहिल्यानगर ४१३७१० येथे छापून दैनिक 'जनता आवाज', मु.पो. कोल्हार बु., ता. राहाता जि. अहिल्यानगर, ४१३७१० जिल्हा कार्यालय- गाळा नं.१, विवेकानंद पॅलेस, श्रीराम चौक, बोल्हेगाव, अहिल्यानगर ४१४१११. (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. विभागीय कार्यालय- जिजामाता चौक, सोमैय्या हायस्कूल शेजारी, व्यापारी संकुल बिल्डिंग, दुसरा मजला, ता. श्रीरामपूर, जिल्हा अहिल्यानगर, ४१३ ७०९, * कार्य. संपादक : महेश पोपट रक्टाटे. पोस्टल परवाना क्र. SRP/141/2025-2028/ PRGI No. MHMAR/25/RAA11.
This daily Janta Awaj is published by Ajit Ramesh More, owner, printer, publisher and editor at Janta Awaj Press Gut No. 25/1/2/3, Kolhar Bk., Tal.- Rahata, Dist.- Ahilyanagar-413710. Published at District Office- Shop No.1, Vivekanand Palace, Shriram Chowk, Bolhegaon, Ahilyanagar-414111. Divisional Office-Jijamata Chowk, Near Somaiyya High School, Business Complex Building, 2nd Floor, Tal.-Shrirampur, Dist. -Ahilyanagar-413709
* Executive Editor- Mahesh Popat Raktate. Postal License Number-SRP/141/2025-2028 PRGI No.- MHMAR/25/RAA11

# झाडांवरील जाहिराती हटवण्याची मोहीम

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** पर्यावरण दिनाच्या निमित्ताने गुरुवार, ५ जूनपासून शहरातील झाडांवर लावलेल्या जाहिराती काढणे, फांद्यांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढण्याची मोहीम महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणार आहे. महानगरपालिकेच्या उद्यानांपासून या मोहिमेला सुरुवात करण्यात येणार असल्याची माहिती उपायुक्त संतोष टेंगले यांनी दिली. शहरातील अनेक झाडांवर खिळे ठोकून पोस्टर, बॅनर लावून जाहिराती केल्या जात आहेत. पर्यावरण दिनाच्या निमित्ताने या जाहिराती हरवणे, झाडांमध्ये अडकलेला नायलॉन मांजा काढणे, झाडाभोवती असलेले जुने व खराब झालेले, तुटफूट झालेले ट्री गार्ड काढून घेणे आदी कामे या मोहिमेत करण्यात येणार आहेत. उद्यान विभागामार्फत ही मोहीम राबविण्यात येणार आहे.तसेच, जागतिक पर्यावरण दिनानिमित्त उद्या, ५ जून रोजी महानगरपालिकेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी वृक्ष लागवड मोहिमेचा शुभारंभ करण्यात येणार आहे. या उपक्रमांतर्गत शेकडो वृक्षांची लागवड करून शहरात हरित आवरण वाढवण्याचा आणि निसर्गसंपन्न वातावरण निर्मितीचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

# शेवगावात जिल्ह्यातील कुस्तीपटू दाखल



**जनता आवाज वृत्तसेवा**

**शेवगाव :** अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ, शेवगाव तालुका तालीम संघ आणि वंदे मातरम क्रीडा व सांस्कृतिक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने शेवगाव येथे बुधवार (दि.४ जून) पासून प्रारंभ झालेल्या देवाभाऊ जिल्हा केसरी कुस्ती स्पर्धेसाठी मोठ्या संख्येने जिल्ह्यातील कुस्तीपटू दाखल झाले आहेत. सकाळी कुस्तीपटूंचे वजन घेण्यात आले. शेवगावच्या खंडोबानगर मैदानावर स्पर्धेची तयारी पूर्ण झाली असून, संध्याकाळी स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन होणार आहे. भाजपचे प्रदेश सरचिटणीस तथा या स्पर्धेचे आयोजक अरुण मुंढे व जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. वैभव लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे उत्तमपणे नियोजन करण्यात आले आहे. निमंत्रित कुस्त्यांबरोबर ४२, ४८, ५२, ५५, ६०, ६५, ७४, ८४ किलो आणि ८४ ते १२५ किलो ओपन गटात कुस्त्यांचा थरार रंगणार आहे. कुस्त्यांसाठी दोन मातीचे आखाडे तयार करण्यात आले आहे.

# तंत्रज्ञान समजून घेत खरीप पिकांची लागवड करा

## शैलेश देशमुख; विकसित कृषी संकल्प अभियान जनजागृती अभियान

**जनता आवाज वृत्तसेवा**

**लोणी :** खरीप पिकाचे उत्पादन तंत्रज्ञान समजून घेत शेतकऱ्यांनी खरीप पिकाची लागवड करावी. पेरणी करतांना असताना बियाणे निवड, उगवण चाचणी, पेरणी सोबत खतांचा वापर, मिश्र पिक पध्दत,योग्य लागवड अंतर आणि बीज प्रक्रिया करुन शेतकऱ्यांनी पेरणी करावी, असे प्रतिपादन बाभळेश्वरच्या कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख शास्त्रज्ञ शैलेश देशमुख यांनी केले.

शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान आणि नवीन बियाणांच्या जाती बद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी २९ मे ते १२ जून या कालावधीत 'विकसित कृषी संकल्प अभियान' ही देशव्यापी मोहीम सुरू झाली. संस्थेचे अध्यक्ष तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालीनीताई विखे पाटील आणि संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रियाताई ढोकणे, संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र बाभळेश्वर, कृषी विभाग, महाराष्ट्र शासन, केंद्र, आणि राज्य पातळीवरील संस्था, महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी आणि आत्मा अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर जिल्ह्यातील राहाता, श्रीरामपूर, राहुरी, कोपरगाव ,अकोले, संगमनेर आणि पारनेर या तालुक्यांमध्ये ही मोहीम सुरु आहे. या अंतर्गत आयोजित जनजागृती कार्यक्रमात देशमुख बोलत होते. यावेळी एन. आय. ए.एस एम. चे डॉ. विजय काकडे, डॉ. गोरक्ष वाकचौरे, के. व्ही. के. चे शास्त्रज्ञ शांताराम सोनवणे, डॉ. प्रियंका खर्डे, डॉ, विलास घुले, सज्जला लांडगे, डॉ. विठ्ठल विखे, कैलास लोंढे आणि बचत गटातील महिला, शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांशी संवाद साधतांना शैलेश देशमुख म्हणाले, मागील आठवड्यामध्ये बहुतांश भागांमध्ये चांगला पाऊस झाला. परंतु हा पाऊस आणि वापसा याचा अंदाज घेऊनच पेरणीसाठी घाई करुन नका. पेरणीसाठी योग्य अंतर, पेरणीच्या वेळी बीज प्रक्रिया आणि पेरणी सोबत खताचाही वापर शेतकऱ्यांनी करावा. सोयाबीनची पेरणी १८ इंचावर करुन रासायनिक खते पेरणीच्या वेळी द्यावीत. तणनाशक पेरणीनंतर ४८ तासात वापरावे.



### शेतकऱ्यांसाठी हा सल्ला महत्वाचा

मका पिकांची लागवड ६०२०से.मी. अंतरावर करुन रासायनिक खते विभागून तीन वेळेस देऊन, सूक्ष्म अन्न द्रव्य ही सेंद्रिय खतात मिसळून द्यावी. पुढील हंगामात कोणते पिक घ्यावयाचे आहे त्या नुसार तणनाशक वापरावे. लष्करी अळीसाठी एकात्मिक किड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करावा. कपाशीमध्ये लाल्याच्या नियंत्रणासाघी सासायनिक खाते विभागून ३-४ वापर करावा. मॅग्नेशियम् सल्फेट जमिनीतून आणि फवारणी द्वारे करावा.कपाशी लागवड करतांना बागायत ४२ फुट तर जिरायत भागात ५१.५. किंवा ६१ फुट अंतरावर करावी. आंतरपिक म्हणून मूग, उडीद, सोयाबीन यांची निवड करावी असे सांगितले.

# शिक्षण मंत्र्याच्या घरावर थाळीनाद मोर्चा काढणार

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** शालेय पोषण आहार शिकवणाऱ्या कर्मचारी यांना हरियाणा राज्य सरकारच्या धर्तीवर ७००० रुपये मानधन मिळावे, याबाबत ५ जुलै २०२४ च्या मंत्रिमंडळ निर्णयाची अंमलबजावणी करावी, किमान २० लाखांचे विमा संरक्षण लागू करावे, यासह विविध मागण्यासाठी सम्यक फाऊंडेशन प्रणित श्रमिक मजदुर संघ शालेय पोषण आहार कर्मचारी संघटना यांच्या वतीने ८ जून २०२५ रोजी सकाळी ११.३० वाजता शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या मालेगाव येथील राहत्या घरावर थाळी नाद मोर्चाचे आयोजन केल्याची माहिती संघटनेच्या राज्य समन्वयक तथा अहिल्यानगर जिल्ह्याच्या अध्यक्षा सविता महेंद्र विधाते यांनी सांगितले.

शालेय पोषण आहार कर्मचारी यांना अनेक अडीअडचणींचा सामना करावा लागत आहे.दरवर्षी होणारा करार रद्द करून तो तीन वर्षातून एकदाच घ्यावा, या कर्मचाऱ्यांना वैद्यकीय तातडीची मदत रुपये एक लाख मिळावे, अशा विविध मागण्यांसाठी आणि शासनाचे लक्ष वेधून घेऊन त्या तातडीने सोडविण्यासाठी हा थाळी नाद मोर्चा काढण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.


या बैठकीला संघटनेचे राज्य समन्वयक सुभाष सोनवणे, राज्य समन्वयक कैलास पवार, जिल्हा सरचिटणीस विद्या अभंग, कोपरगाव तालुका अध्यक्ष प्रकाश पानपाटील, किरण कदम, गुलाब शेख, सुभद्रा काटे,सुनीता लटके, मुक्ता पवार आदि पदाधिकारी उपस्थित होते.

# जिल्ह्यात ४ ते ७ जून दरम्यान पाऊस

## हवामान खात्याचा अंदाज; जिल्हा प्रशासनाचे सर्तकतेचे आवाहन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** जिल्ह्याच्या काही भागात दि. ४ ते ७ जून या कालावधीत वीजांच्या कडकडाटासह वादळे, हलक्या ते मध्यम स्वरुपाचा पाऊसा आणि सोसाट्याचा वारा वाहण्याची हवामान खात्याने शक्यता वर्तवली आहे. जिल्ह्यासाठी पिवळा इशारा (यलो अलर्ट) जारी करण्यात आलेला आहे. नागरिकांनी आवश्यक ती दक्षता घेण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात आले आहे.



मेघगर्जनेच्या वेळी, वीजा चमकत असताना किंवा वादळीवारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. गडगडाटीच्या वादळादरम्यान व वीजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये. वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा. ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल/ सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातुचे कुंपण, विद्युतवाहिनी अथवा ट्रान्सफॉर्मरजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या किंवा लोंबकळणाऱ्या केबल्स पासून दूर रहावे. जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी.

वीजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे. जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा. धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये. धोकादायक ठिकाणी सेल्फी काढू नये.

# लोकनेते मुंडे यांना कोपरगावात अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**कोपरगाव :** जनसामान्यांच्या विविध प्रश्नांवर रस्त्यावर उतरुन कार्यकरणारे स्व. गोपीनाथ मुंढे यांच्या सारखे संघर्ष योध्दा आजच्या तरुणांना आजही प्रेरणादायी वाटत असल्याचे भाग्यश्री बडदे यांनी याप्रसंगी सांगितले.

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे पुण्यस्मरण समिती कोपरगांव यांच्या वतीने गोपीनाथ मुंडे यांचे ११ व्या पुण्यस्मरण निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज स्मारका जवळ प्रतिमा पुजन करण्यात आले. याप्रसंगी आणिबाणी चळवळीचे नेते प्रकाश सवाई, मार्केट कमिटीचे संचालक रामदास केकाण, स्वच्छतादूत सुशांत घोडके, सेवानिवृत्त प्राचार्य सुरेश कातकडे, संजीवनी कारखाना संचालक सतिष आव्हाड, नर्मदेश्वर फाऊंडेशनचे संस्थापक सागर केकाण, भाजपा महिला आघाडी जिल्हा उपाध्यक्षा विजया देवकर,भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव, शिवसेनेचे अभिषेक आव्हाड यांचे सह कोपरगांवातील नागरिक उपस्थित होते.



या प्रसंगी प्रकाश सवाई म्हणाले, स्व. गोपीनाथराव मुंडे, स्व. भिमराव (नाना) बडदे , स्व. प्रमोद महाजन यांचेसह राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक यांना तत्कालीन केंद्र सरकारने १९ महिने जेलमध्ये बंदीवान केले. मुंडे, बडदे यांच्यासारखे अनेक कुटुंब उध्वस्त करण्याचा सरकारने डाव आखला. मात्र ही सर्व मंडळी मोठ्या धाडसाने संघर्षाला सामोरे गेली. १९ महिने गोपीनाथराव मुंडे, भिमराव बडदे, प्रमोद महाजन आम्ही एकाच जेलमध्ये एकत्र एक परिवार म्हणून राहिलो.नंतर गोपीनाथराव मुंढे मोठे लोकनेते झाले. कोठेही सार्वजनिक कार्यक्रमात भेटले तर आवर्जून ओळख देवून जवळ बोलवायचे. ही आठवण सांगतांना सवाई हे भावनिक होवून त्यांना अश्रू अनावर झाले. भाजपा शहराध्यक्ष वैभव आढाव यांनी गोपीनाथराव मुंढे यांचे ऊस तोडणी कामगार ते उच्चशिक्षित लोकनेता असा प्रवास सांगितला. त्यानंतर सेवानिवृत्त प्राचार्य सुरेश कातकडे यांनी गोपीनाथराव मुंढे यांच्या कोपरगांवातील जुन्या आठवणी सांगितल्या. तसेच शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे यांचेशी मुंढे परिवाराशी असलेले ऋणानुबंध अनेकांनी व्यक्त केले.तसेच प्रतिमा पुजनानंतर 'लोकनेते गोपीनाथराव मुंढे अमर रहे', 'भारत माता की जय' अशा घोषणा देण्यात आल्या.

# शेरमाळे पुरस्काराने सन्मानित



**जनता आवाज वृत्तसेवा**

**संगमनेर :** संगमनेर तालुक्यातील समनापुर येथील ग्रामपंचायतच्या वतीने सोनाली विनोद शेरमाळे यांना राजमाता अहिल्याबाई होळकर आदर्श महिला पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला.

शेरमाळे या गेली दहा वर्षापासून आशा सेविका म्हणून कार्यरत आहे. त्यांनी त्यांच्या सेवेच्या काळात गावात उत्कृष्ट काम केले म्हणून राज्य शासनाने त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना अहिल्याबाई होळकर जयंतीनिमित्त सरपंच कमाल बर्डे आणि ग्रामविकास अधिकारी सुनील नागरे यांच्या हस्ते देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी संपत गेठे, रणजित जाधव, का. पो. पा. गणेश शेरमाळे, तंटामुक्त अध्यक्ष सोम नाथ शेरमाळे, उमा शेरमाळे, राजू गायकवाड, राजेश शेरमाळे, दादासाहेब नेहे, दिलीप शेरमाळे, सुनील चांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# शिवाजी चौकातच छत्रपतींचा पुतळा बसवा अन्यथा तीव्र आंदोलनाचा मनेसचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**श्रीरामपूर :** छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर संभाजी महाराज यांच्या पुतळा स्थापनेसंदर्भातील वादग्रस्त मुद्द्यावर श्रीरामपूरात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेतली असून, शहराच्या मध्यवर्ती शिवाजी चौकातच शिवरायांचा अश्वारूढ पुतळा बसवण्यात यावा, अन्यथा तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा थेट इशारा मनसे शहराध्यक्ष स्वप्नील सोनार यांनी दिला आहे. मनसेच्या शिष्टमंडळाने नगरपरिषदेचे मुख्याधिकारी मच्छिंद्र घोलप यांची भेट घेऊन यासंदर्भात सविस्तर निवेदन सादर केले. यावेळी स्वप्नील सोनार म्हणाले की, शिवाजी चौकात शिवरायांचा पुतळा ही मागणी गेल्या ३४ दशकांपासून श्रीरामपूरकरांची आहे. ही केवळ राजकीय नव्हे, तर भावनिक मागणी आहे. २०२४ मध्ये पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील आणि महंत रामगिरीजी महाराज यांच्या हस्ते याच ठिकाणी भूमिपूजन पार पडलेले असताना, आता अन्य ठिकाणांचा विचार करणे हा जनभावनेचा अपमान ठरेल. या निवेदनावर जिल्हाध्यक्ष बाबासाहेब शिंदे, जिल्हा सचिव डॉ. संजय नवथर, जिल्हा संघटक प्रवीण रोकडे, उपजिल्हाध्यक्ष सतीश कुदळे, तालुकाध्यक्ष अमोल साबणे, शहर उपाध्यक्ष संदीप विसंबर, तसेच कार्यकर्ते विनोद शिरसाठ, समीर शेख, मारुती शिंदे आदींच्या सह्या आहेत. हे सर्व पदाधिकारी आजच्या शिष्टमंडळात सहभागी होते.सोनार यांनी धर्मवीर संभाजी महाराजांचा पुतळा भाजी मंडईसमोर सुरू असलेल्या ठिकाणी बसवण्याची मागणीही केली. सदर ठिकाणी लाखो रुपये खर्चून बांधकाम सुरू असून, हा निधी वाया न जाऊ देता संभाजी महाराजांचा पुतळा तिथेच बसवावा. यामुळे दोन्ही थोर राजांनी योग्य त्या स्थानावर सन्मानाने स्थान मिळेल.



# अंगणवाडी सेविकांना मिळणार शिक्षकांचा दर्जा

## आता चिमुकल्यांना अंगणवाडीत देणार ज्ञानाचे धडे

**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** राज्य सरकारच्या शालेय शिक्षण विभागामार्फत २०२५-२६ या शैक्षणिक वर्षापासून नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुरू होणार आहे. अंगणवाडी सेविकांना शिक्षकांचा दर्जा मिळणार आहे. अंगणवाडी सेविका आता चिमुकल्यांना ज्ञानाचे धडे देणार आहेत. या अंतर्गत अंगणवाडी आणि इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्णतः बदलण्यात येणार आहे. त्यानुसार प्राथमिक शाळांतील पहिलीच्या शिक्षकांना तसेच अंगणवाडी सेविकांना विशेष प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

राज्यातील ५५३ एकात्मिक बालविकास प्रकल्पांतर्गत तब्बल १ लाख १० हजार ५५६ अंगणवाड्या कार्यरत आहेत. त्यामध्ये सव्वा लाखांपेक्षा अधिक अंगणवाडी सेविका कार्यरत आहेत. यापैकी इयत्ता बारावी उत्तीर्ण सेविकांना प्राथमिक टप्प्यात सहा महिन्यांचे आणि दहावी उत्तीर्ण सेविकांना एक वर्षाचे बालशिक्षण प्रशिक्षण दिले जाणार आहे. या प्रशिक्षणाद्वारे सेविकांना ३ ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना कसे शिकवायचे, त्यांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी कोणत्या उपक्रमांचा वापर करायचा, याचे मार्गदर्शन दिले जाणार आहे. विशेष म्हणजे, पालकांनाही या प्रक्रियेत सामावून घेतले जाणार आहे, जेणेकरून घर आणि अंगणवाडीत एकसंघ विकास वातावरण निर्माण होईल.



नवीन धोरणात मनोरंजनातून शिक्षण म्हणजेच खेळत खेळत शिक्षण या तत्त्वाला अधिक प्राधान्य देण्यात आले आहे. त्यामुळे, चिमुकल्यांना शाळेची गोडी लागावी आणि ती कायम राहावी, यावर भर दिला जात आहे. अक्षर, अंक, रंग, आकार ओळख, शब्दांचे उच्चार, मुळाक्षरे हे शिक्षण आता सेविका अधिक प्रभावी आणि सर्जनशील पद्धतीने देतील.

### प्रशिक्षणासाठी कार्यशाळांचा आधार

सर्व अंगणवाडी सेविकांना एकाच पातळीवर आणण्यासाठी, त्यांना बालशिक्षण प्रमाणपत्र अभ्यासक्रम शिकवण्यात येणार आहे. या अभ्यासक्रमासाठी डायट (जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था) मार्फत एकूण ८ कार्यशाळा आयोजित करण्यात येणार असून आतापर्यंत २ कार्यशाळा पार पडल्या आहेत. बारावी उत्तीर्ण सेविकांना ६ महिने ऑनलाईन प्रशिक्षण दिले जाईल. दहावी उत्तीर्ण सेविकांसाठी हा कालावधी एक वर्षाचा असणार आहे. या अभ्यासक्रमात शिक्षणाचे तंत्र, अध्यापन कौशल्ये, खेळावर आधारित शिकवण्याच्या पद्धती यांचा समावेश असणार आहे.

# कचरा वेचकांना आरोग्यासाठी मार्गदर्शन

## महापालिकेचा उपक्रम; विविध कल्याणकारी योजनांची माहिती



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आहिल्यानगर :** शहर स्वच्छ ठेवण्यासाठी सतत झटणाऱ्या कचरावेचकांचे आरोग्य व सुरक्षितता अबाधित रहावे, यासाठी अहिल्यानगर महापालिकेच्या वतीने शहरातील कचरावेचकांसाठी विशेष प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले. या शिबिराला कचरावेचकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमात कचरावेचकांना निरोगी आरोग्य राखण्यासाठी आवश्यक खबरदारी, विविध आजारांपासून बचावाचे उपाय, उपचारासाठी असलेल्या योजना तसेच केंद्र शासनाच्या नमस्ते योजना व अन्य कल्याणकारी योजनांची माहिती देण्यात आली. शिबिरात अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था संघटक रमजान अली रंगरेज यांनी प्रत्यक्ष कचरा गोळा करताना घ्यावयाची काळजी, हातमोजे, मास्क, सॅनिटायझर वापराचे महत्त्व याबाबत प्रात्यक्षिकांसह माहिती दिली. उतारवयात होणाऱ्या आजारांपासून बचाव, शारीरिक तंदुरुस्ती राखण्याचे उपाय यावरही विशेष मार्गदर्शन केले.केंद्र शासनाच्या नमस्ते योजनेच्या माध्यमातून कचरावेचकांची नोंदणी सुरू आहे. या योजनेतून त्यांना रोजगार, विमा, आरोग्य तपासण्या, औषधोपचार व सामाजिक सुरक्षा योजनांचा लाभ मिळणार असल्याची माहिती देण्यात आली. यावेळी महापालिकेच्या घनकचरा विभागाचे लांडगे व कष्टकरी पंचायतचे जिल्हा समन्वयक विकास उडानशिवे, विकास धाडगे, मनोहर चखाले, विकास वाल्हेकर, सागर खुडे, रोहन साबळे, काळू खुडे आदींसह कचरा वेचक मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिबिराच्या आयोजनात महापालिका आयुक्त यशवंत डांगे, उपायुक्त संतोष टेंगले, सहाय्यक आयुक्त सपनाबेन वासवा, घनकचरा व्यवस्थापन प्रमुख अशोक साबळे, तसेच माजी नगरसेवक व कागद काच पत्रा कष्टकरी पंचायतचे अध्यक्ष भाऊसाहेब उडानशिवे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

# पिंप्रीलौकी अजमपूर हे मतभेदामध्ये नंबर वन

## डॉ. सुजय विखे पाटील; निळवंडे धरणातील कालव्याच्या पाण्याचे जलपूजन



**जनता आवाज वृत्तसेवा**

**आश्वी :** मतदान जाण्याचे कारण विकासाचे मुद्दे नसतात, तर गावातील कार्यकत्यांचे अंतर्गत वादामुळे व मतभेदामुळे मतदान कमी होते. मतभेदाचे विचार केला. तर शिर्डी मतदार संघातील पिंप्रीलौकी अजमपुर हे मतभेदामध्ये एक नंबरला आहे. गावाच्या तीन नावाप्रमाणेच गावामध्ये तीन पुढारी मोठे आहे, आपआपसात हे भांडणे बाजुला सारून विधानसभा निवडणुकीत एकमेकांच्या गळ्यातगळे घालुन फिरतात. ही बाब वाखण्याजोगी असल्याचे मत पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांनी व्यक्त केले.

> स्वांतत्रकाळानंतर पहिल्यांदा गावाचे हस्तांतरण जेव्हा शिर्डी मतदारसंघात झाले. शालिनीताई विखे पाटील तेव्हा जिल्हा परिषद अध्यक्षा होत्या. त्या काळात राष्ट्रीय पेय जेल योजने अंतर्गत गावासाठी करोडो रुपयांची योजना दिली. उलट काहीनी जाणीवपुर्वक गावाला पाणी मिळण्यापासुन वंचित ठेवले होते. पण शालिनीताई विखे पाटील तसेच जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या पुढाकाराने निळवंडे कालव्यातुन गावतील ओढे, नाले, वाहु लागले, हा क्षण माझ्यासाठी आंनदाचा आहे.
>
> **– डॉ. सुजय विखे, चेअरमन : विखे कारखाना, प्रवरानगर**

निळवंडे धरणाच्या कालव्याचे पाणी पुजन पिंप्रीलौकी अजमपुर येथे संपन्न झाले. त्यावेळी डॉ. सुजय विखे पाटील बोलत होते. यावेळी कारखान्याचे संचालक विजयराव म्हसे, आर. डी. कदम, प्रा. कान्हु गिते, पोपट वाणी, भारत गिते, सरपंच संगीता गिते, भाऊसाहेब लावरे, भाऊसाहेब मुंढे, रमेश कदम, भिमराज गिते, रमेश गिते, सिताराम गिते, अनुप कदम, नारायण कहार यासह लार्भार्थी, शेतकरी ग्रामस्थ उपस्थित होते.

पुढे बोलतांना ते म्हणाले की, निळवड्यांचे पाणी पिंप्रीलौकी गावासाठी मिळावे म्हणून अनेकांनी भाषणे केली. तर गावामध्ये गढुळ राजकारण सुध्दा केले. निळवंडे धराणाचे काम पुर्ण झाल्यावर पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना पाणी सोडण्याचा मान ही पहिल्यादा मिळाला. तसेच धरणाचे पाणी सोडल्यानंतर गावामध्ये पाणी पुजनाचा मान ही विखे परीवारला मिळत आहे.

स्व. बाळासाहेब विखे पाटील यांचे पुण्य फार मोठे होते. त्यांच्या पुण्याईमुळेच विखे परीवाराला शिर्डी विधानसभा मतदारसंघात तसेच संगमनेर विधानसभा मतदारसंघात पाणी पुजन करण्याचे भाग्य मिळाले. राजकारण हे केवळ आश्वसानातुन नव्हे तर कृतीतून करायचे असते व ते आपण करून दाखवले. गावातुन विधानसभा निवडकीमध्ये ७० टक्के मतदान हे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना झाले. उरवरीत ३० टक्के मतदान ही भविष्यात येणाऱ्या निवडणुकीत आपल्यालाच होणार यात काही शंका नाही. निळवड्यांचे पाणी जसजसे गावा गावमध्ये वाडी वस्तीवर पोहचु लागले तसे मन परिवर्तन व मतपरिवर्तन झाले.

---

# जामखेड परिसरातील कलाकेंद्र नियमानुसार चालवावे

## रमेश आजबे यांनी दिले ‘त्यांना’ जोरदार प्रतिउत्तर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** ॲड. अरूण जाधव यांनी वड्याचे तेल वांग्यावर आणू नये, गोळीबार व कलाकेंद्र काहीही संबंध नाही, अशा आशयाची बातमी दिली होती. त्यास आजबे यांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे. उज्वल जामखेडच्या भवितव्यासाठी कलाकेंद्र नियमानुसार चालले, तर काहीच प्रश्नच राहणार नाहीत, असे सामाजिक कार्यकर्ते रमेश आजबे यांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे. तसेच ॲड. अरूण जाधव यांनी कलाकेंद्रात सीसीटीव्ही बसवण्यासाठी आंदोलन करावे, असेही सांगितले.

रमेश आजबे म्हटले आहे की, ज्या पोरांनी गोळीबार केला ते आरोपी मटका धंद्याशी निगडित आहेत आणि ते पोरं जामखेडला येऊन दोन कलाकेंद्रावर जाऊन फिरुन येतात. त्यानंतर दारूच्या नशेत येऊन ते गोळीबार करतात. त्यांचे जामखेडला यायचं कारण म्हणजे जामखेडचे कलाकेंद्र आणि तिथे चाललेला नंगानाच या पोरांचा जामखेडच्या कलाकेंद्राशी काय संबंध आहे. हे अरूण जाधव यांनी पाहावे जामखेडच्या कलाकेंद्रामधील अवैध धंदे व शहरातील अवैध धंदे यास प्रशासनाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे.

> जामखेड नगरपरिषद यांनी केळी विकणारे, फ्रुट विकणारे यांना उठवून त्या ठिकाणी टपऱ्यामध्ये राजरोसपणे मटका घेण्यासाठी पत्र्याचे शेड मारले आहेत का? हे तुम्हाला दिसलं नाही का? त्या मटक्याच्या धंद्यामध्ये गोरगरिबांचे घर गेले जमिनी गेल्या हे तुम्हाला दिसलं नाही का? उगाच उठून निवडणूक डोळ्यासमोर ठेवून तुम्ही उगाच जात गरीब या विषयावर काम करू नका.
>
> **– रमेश आजबे**



तसेच नगरपरिषदेच्या गळ्यामध्ये राजरोसपणे मटक्याचा धंदे चालतात आहे. याकडे मुख्याधिकारी यांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष आहे. नगरपरिषद हद्दीत काही कलाकेंद्र आहेत. यातील अनेक कलाकेंद्र नियमांचे उल्लंघन करतात. यामुळे तरूण पिढी बिघडत चालली आहे. तुम्हाला जर एवढाच कला केंद्राचा पुळका असेल तर त्या कला केंद्रावर गाड्यांच्या एन्ट्री पासून ते आत चाललेल्या कलेपर्यंत सीसीटीव्ही बसवून द्या. म्हणजे महाराष्ट्रातले अर्धे गुंड आणि त्या गुंडांच्या टोळ्यांमधील लोक पोलिसांना जामखेडमध्ये सापडतील.

---

# बाळासाहेब वाघमारे म्हणजे शिस्तीसह प्रेरणेची वाट : डॉ. संदेश शेळके

**जनता आवाज वृत्तसेवा**

**झरेकाठी :** शाळा म्हणजे केवळ चार भिंतींमधील अभ्यासक्रमाची उजळणी नसते. ती आयुष्याची पहिली आणि सर्वात महत्त्वाची प्रयोगशाळा असते. या प्रयोगशाळेत, काही शिक्षक असे असतात जे केवळ पुस्तकी ज्ञान देत नाहीत, तर जीवनाचं सार शिकवून जातात. आमच्यासाठी असेच एक दीपस्तंभ होते, अशी कृतज्ञता डॉ. संदेश शेळके यांनी प्रा. बाळासाहेब वाघमारे यांच्याबद्दल व्यक्त केली.

वर्गात इतकी शांतता असे की, चुकून एखादी टाचणी जरी खाली पडली तरी तिचा आवाज ऐकू येईल. वेळेवर वर्गात येणं, वेळेवर शिकवणं आणि प्रत्येक विद्यार्थ्याच्या लहानसहान चुकाही काटेकोरपणे निदर्शनास आणून देणं, हे त्यांच्या शिकवण्याचं वैशिष्ट्य होतं. यामुळे सुरुवातीला अनेक विद्यार्थ्यांना ते नावडते शिक्षक वाटायचे. पण आज मागे वळून पाहताना लक्षात येतं की, त्यांचा तो काटेकोरपणा, ती शिस्त आणि विद्यार्थ्यांप्रती असलेली त्यांची नितांत काळजी, हाच तर त्यांचा खरे मोठेपणा होता.



आज जेव्हा त्या दिवसांची आठवण येते, तेव्हा जाणवतं की वाघमारे सर केवळ इंग्रजीचे शिक्षक नव्हते, तर ते जीवनशिक्षक होते. त्यांच्या प्रत्येक शब्दातून ते आमच्यात आत्मविश्वास जागवायचे. इंग्रजी व्याकरणातील चुका दुरुस्त करताना ते नकळतपणे आमच्या विचार शक्तीला धार लावायचे. त्यांनी आम्हाला केवळ इंग्रजी भाषाच शिकवली नाही, तर त्याहून महत्त्वाचं म्हणजे, त्यांनी आम्हाला योग्य बोलणं, योग्य वागणं आणि आत्मविश्वासाने उभं राहणं शिकवले.

---

# स्व. ढवण यांची जयंती विविध कार्यक्रमांनी संपन्न

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** येथील सामाजिक कार्यकर्ते स्व.दिगंबर महाराज ढवण यांची जयंती आहिल्यादेवी विचार मंच, स्व. लोकनेते दिगंबर महाराज ढवण मित्र मंडळ यांच्या वतीने विविध कार्यक्रमांनी संपन्न झाली. सकाळी मांजरसुंभा येथील श्री क्षेत्र गोरक्षनाथगड गोशाळा येथे चारा वाटप व गोरक्षनाथ मंदिर येथे प्रसाद वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



> कार्यक्रमांत त्यांच्या जन्म दिनानिमित्त यावेळेस अनेकांनी आपल्या आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी प्रथम ढवण महाराजांचे प्रतिमा पूजन करण्यात आली. त्यानंतर गोरक्षनाथाची आरती व महाप्रसाद संपन्न झाला. यावेळी गोशाळेतील गायांना चाराही देण्यात आला.

यावेळी माजी नगरसेविका शारदाताई ढवण, विशाल नाकाडे, वैभव लांडगे, सचिन शिंदे, निलेश सत्रे, शरद ढलपे, राहुल मोरे, पंकज बाहेती, जालिंदर खेडकर, बाळासाहेब खाकाळ, पोपट पोळ, चंद्रकांत फणसे, संदीप तागड, सुनील ढवण, संतोष उर्फ बंटी गर्जे, गणेश मोरे, सर्व ढवन परिवार यांच्यासह गोरक्षनाथ देवस्थानचे विश्वस्त वआहिल्यादेवी विचार मंच, स्वलोकनेते दिगंबर महाराज ढवणमित्र मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

कै. दिगंबर ढवण हे पूर्ण नगर शहराला परिचित होते, २४ तास उपलब्ध असणाऱ्या कार्यकर्ता, नगरसेवक म्हणून त्यांची ओळख होती. तपोवन रोड परिसरात त्यांनी अनेक विकासकामे मार्गे लावली, त्यासाठी त्यांनी अनेक आंदोलनही केली होती.

---

# शिरसगाव ग्रामपंचायत अधिकारीपदी मनीषा तोडमल

**जनता आवाज वृत्तसेवा**

**शिरसगाव :** श्रीरामपूर तालुक्यातील शिरसगाव ग्रामपंचायत येथे जिल्हा परिषद यांचे आदेशानुसार मनीषा तोडमल यांची ग्रामपंचायत अधिकारीपदी नियुक्ती झाली आहे.

शिरसगाव येथे आल्यावर गणेशराव मुद्गुले, सरपंच राणीताई वाघमारे आदींनी स्वागत केले आहे. पीपी दर्शने यांच्याकडे दोन गावाचा कार्यभार असल्याने ते निपाणी वडगाव येथे पूर्ववत काम पाहतील. मनीषा तोडमल २००५ यावर्षी सेवेत आल्या. २००५ ते २०१६ पर्यंत नगरपंचायत समिती अंतर्गत ग्रामपंचायत नांदगाव व विळद येथे काम पाहिले. २०१६ ते २०२५ पर्यंत राहुरी पंचायत समिती अंतर्गत ६ वर्ष जातपचांदेगाव व ३ वर्ष चिंचोली येथील पदभार संभाळला. शिरसगाव येथे स्वतंत्र पदभार असल्याने तोडमल यांच्या माध्यमातून कामे लवकरात लवकर होतील, अशी ग्रामस्थांना अपेक्षा आहे.

---

# अवैध व्यावसायिकांना पोलिस निरीक्षकांचा इशारा

**जनता आवाज वृत्तसेवा**

**वैजापूर :** दि. ७ जून रोजी बकरी ईद साजरी होणार असून, या पार्श्वभूमीवर वैजापूर पोलीस ठाण्याचे नवीन पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांनी मंगळवारी शांतता समितीची बैठक बोलावली होती. उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत शहरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

पोलीस निरीक्षक ताईतवाले यांनी वैजापूर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सर्व अवैध धंदे, वाहतूक कोंडी, वाळू तस्करी, जुगार आणि व्यसनांना आळा घालण्यासाठी कठोर पावले उचलण्याचे आश्वासन दिले. बकरी ईद शांततेत आणि सौहार्दपूर्ण वातावरणात साजरी व्हावी, यासाठी सर्वांनी सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी नागरिकांना शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सहभागी होण्याचेही आवाहन केले.

उपविभागीय पोलीस अधिकारी भागवत फुंदे म्हणाले की, बकरी ईद सणाच्या निमित्ताने शहरातील सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन बंधुता आणि मानवता जपावी, असे सांगितले. सर्व जाती, धर्म आणि पंथाच्या नागरिकांनी कायदा व सुव्यवस्था राखून सण साजरा करावा, असे त्यांनी नमूद केले. त्यांनी वैजापूरातील शांततापूर्ण वातावरण कायम राखण्यासाठी सर्वांना सहकार्य करण्याचे आवाहन केले.



### कायदा व सुव्यवस्थेतून बळकटी मिळणार

बैठकीतून वैजापूरात शांतता, सुव्यवस्था आणि सौहार्द राखण्यासाठी सर्वांनी एकजुटीने प्रयत्न करण्याचे ठरले. नवीन पोलीस निरीक्षकांच्या नियुक्तीमुळे शहरातील कायदा व सुव्यवस्थेला बळकटी मिळेल, अशी आशा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### नागरिकांसह मुस्लिम बांधवाची हजेरी

बैठकीला इम्रान कुरेशी, अकिल कुरेशी, करीम मौलाना, इरफान कादरी, रवी पगारे, श्रीराम गायकवाड, सरपंच दौलत गायकवाड, रियाजुद्दीन शेख, काझी लईक इनामदार, धर्मेंद्र त्रिभुवन, निलेश पारख, शैलेश पोंदे, राजेंद्र जानराव, कचरू राजपूत आणि पोलीस निरीक्षक विजय देशमुख यांच्यासह अनेक नागरिक आणि मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या सुरुवातीला शांतता समितीचे सदस्य धोंडीरामसिंह राजपूत यांनी बैठकीचा उद्देश स्पष्ट करत नवीन पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले यांचे वैजापूरवासीयांतर्फे स्वागत केले. या बैठकीत किराणा असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश शेठ बोथरा, अखिल शेख, काझी हाफीजोदीन यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

शहरातील विविध समस्यांवरही या बैठकीत चर्चा झाली. दिनेश राजपूत, प्रेम राजपूत, अमोल राजपूत, गौरव धामणे, बाबा धुमाळ, शमीम सौदागर, गौरव दौडे, ज्योती हंगे, सुनीता साखरे, निशा गोरक्ष, काझी हाफीजोदीन, सेवेकरी अकबर, विजय त्रिभुवन आणि शेख धसे यांनी शहरातील अडचणी आणि समस्यांवर प्रकाश टाकला.

---

# समाजासाठी झटणाऱ्या व्यक्तींचा सन्मान सकारात्मकतेचे प्रतीक

## खा. निलेश लंके; सन्मान सोहळ्यातून आंबेडकरी विचारांचा जागर

**जनता आवाज वृत्तसेवा**

**अहिल्यानगर :** एसआरपी टायगर मोमेंट व आझाद समाज पार्टी भीम आर्मीचे जिल्हाध्यक्ष नाथाभाऊ आल्हाट यांनी केलेल्या उत्कृष्ट सामाजिक कार्याबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला. खासदार निलेश लंके व आमदार शिवाजी कर्डिले यांनी आल्हाट यांच्या सामाजिक वाटचालीस शुभेच्छा देवून त्यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले.

समाजहितासाठी झटणाऱ्या व्यक्तींचा सन्मान हा समाजातील सकारात्मकतेचा प्रतीक असल्याची भावना खासदार लंके यांनी व्यक्त केली. शेंडी बायपास येथील एका हॉटेलमध्ये झालेल्या सन्मान सोहळ्यात केंद्रीय रेल्वे मंत्रालय प्रमुख सल्लागार सदस्य डॉ. आदित्य पतकराव यांच्या हस्ते आल्हाट यांचा सत्कार करण्यात आला.

> नाथाभाऊ आल्हाट यांच्यासारखी व्यक्तिमत्त्वे समाजात दीपस्तंभासारखी असतात. ते केवळ सामाजिक न्यायाबरोबर हजारोंना एक नवा विचार, नवा दृष्टिकोन देतात. आंबेडकरी विचारसरणीचा प्रसार, सामाजिक समता आणि दलित, शोषित, वंचित घटकांसाठी सातत्याने झगडणे हे त्यांचे ध्येय आहे.
>
> **– डॉ. आदित्य पतकराव**

> शोषित समाजाला आधार देण्यासाठी सर्व युवकांना संघटित करुन सामाजिक कार्य सुरु आहे. शोषित व वंचितांची सामाजिक प्रश्न सुटावी हे विचार आणि ध्येय घेऊन सामाजिक कार्य सुरु आहे.
>
> **– नाथाभाऊ आल्हाट**



कार्यक्रमात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावरील पुस्तकांचे वितरण करून उपस्थितांना आंबेडकरी विचारसरणीची ओळख करून देण्यात आली. विचारसंपन्न समाजाची उभारणी हाच खरा सामाजिक प्रगतीचा मार्ग आहे, हा संदेश कार्यक्रमातून देण्यात आला.

यावेळी भीमशक्ती संघटनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष भाऊसाहेब साठे, वैभव चाबुकस्वार, राष्ट्रवादी सामाजिक न्याय विभाग शहराध्यक्ष सुरेश बनसोडे, पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे सुमित गायकवाड, प्रवीण वाकडे, भीमशक्ती संघटनेचे सुदाम सरोदे, किरण शिंदे, नंदू वाकडे, तालुकाध्यक्ष भागचंद सोनवणे, संदीप भिंगारदिवे, भारत मनतोडे, शेवगाव तालुका अध्यक्ष संदीप पगारे, नेवासा तालुकाध्यक्ष प्रवीण साळवे, आष्टी तालुकाध्यक्ष दीपक गुरु, दीपक शिंदे, नवनाथ शिंदे, हुसेन सय्यद, नारायण शिंदे, भाऊसाहेब आल्हाट, सुरेश वारुळे, भाऊसाहेब ठोंबे, करमाळा तालुका अध्यक्ष अभिमन्यू डाळिंबे आदी उपस्थित होते.

---

# खर्डा येथे स्व. गोपीनाथ मुंडेंना अभिवादन

**जनता आवाज वृत्तसेवा**

**जामखेड :** खर्डा येथे बसस्थानक परिसरात माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांच्या अकराव्या पुण्यतिथीनिमित्त खर्डा शहरासह परिसरातील स्व. गोपीनाथ मुंडे भक्त गण यांच्या वतीने प्रतिमे पूजन करण्यात आले व अभिवादन करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.

यावेळी भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष रवींद्र सुरवसे, जामखेड मार्केट कमिटीचे संचालक वैजिनाथ पाटील, महालिंग कोरे, गणेश शिंदे, आसाराम गोपाळघरे, मदन पाटील, श्रीकांत लोखंडे, डॉ. अंकुश गोपाळघरे, महारुद्र महानवर, संतोष लष्करे, हनुमंत बारगजे, हरिदास गोपाळघरे, तात्याराव होडशीळ, भरत सानप, अर्जुन होडशीळ ओंकार बारगजे, नानासाहेब गोपाळघरे, आसाराम गीते, बाळासाहेब गोपाळघरे, दत्तराज पवार, संतोष थोरात, कपिल लोंढे, पिंटू जायभाय, धनंजय साबळे यांच्यासह खर्डा व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जिल्ह्यातील चार लाख विद्यार्थ्यांना मिळणार पुस्तके

## बालभारतीकडून १०० टक्के पुरवठा; पहिल्याच दिवशी मिळणार पुस्तके

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : १ ५ जुनला शैक्षणिक वर्ष सुरू होते. शाळेत गेल्यानंतर विद्यार्थ्यांना पुस्तकांची आस असते. मात्र मागील वर्षी काहीसे नियोजन हुकल्याने जिल्ह्यातील काही विद्यार्थ्यांना उशिरा पुस्तके मिळाली. परंतु यंदा जिल्हा परिषदेने चोख नियोजन केले असल्याने जिल्ह्यातील ४ लाख विद्यार्थ्यांना पहिल्याच दिवशी पाठ्यपुस्तके मिळणार आहेत. दरवर्षी जिल्हा परिषदेसह सरकारी व खासगी अनुदानित शाळांतील विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. येत्या २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी जिल्हा परिषदेने २३ लाख पुस्तकांची मागणी बालभारतीकडे केली होती. यातील ९९.९५ टक्के पुस्तके जिल्हास्तरावर दाखल झाले असून उर्वरित पुस्तकेही शाळा सुरू होण्याआधी येणार आहेत. त्यामुळे यंदा शाळेच्या पहिल्याच दिवशी पुस्तके विद्यार्थ्यांना मिळणार आहेत. शाळेच्या पहिल्याच दिवशी मुलांना पुस्तके वाटप करण्याचे नियोजन



जिल्हा परिषदेकडून करण्यात आले आहे. त्या पार्श्वभूमीवर प्रत्यक्षात किती पाठ्य पुस्तकांची गरज आहे, याची माहिती प्रत्येक शाळेच्या मुख्याध्यापकांकडून म ार्चमध्येच घेण्यात आली होती.

प्रत्यक्ष पटापेक्षा १० टक्के जास्त पुस्तकांची मागणी शिक्षकांनी केली होती. पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके दिली जातात. यामध्ये जिल्हा परिषद, मनपा व अन्य अनुदानित शाळांचा समावेश असतो. पुढील शैक्षणिक वर्षांत जिल्ह्यातील सुमारे ४ लाख ७ हजार ६७ विद्यार्थ्यांसाठी २३ लाख ८५ हजार ९३१ पुस्तकांची मागणी बालभारतीकडे जिल्ह्यातून करण्यात आली होती. बालभारती पोर्टलवर ही नोंदणी करण्यात आली होती. यापैकी जवळपास ९९.९५ टक्के पाठ्यपुस्तके जिल्ह्याला प्राप्त झाली आहेत. दरम्यान, दप्तराच्या वाढत्या वजनाने विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा परिणाम, खेडोपाडी असलेल्या गरीब शेतकऱ्यांच्या मुलांना शाळेत शिकायला जाताना पुरेसे लेखन साहित्य उपलब्ध नसणे, याचा विचार करून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इयत्ता दुसरी ते इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची कोरी पाने समाविष्ट करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. मात्र, या निर्णयावर शिक्षण क्षेत्रातून टीका करण्यात आली. योजनेचा अपेक्षित उद्देश सफल न झाल्याने पाठ्यपुस्तकांमध्ये वह्यांची कोरी पाने समाविष्ट करण्याचा निर्णय यंदा रद्द करण्यात आला आहे. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ आणि त्यापुढे पूर्वीप्रमाणेच नियमित पाठ्यपुस्तके वह्यांच्या पानांशिवाय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### पुस्तके वाटपाचे नियोजन तयार करण्याचे आदेश

जिल्ह्यातील गटशिक्षणाधिकारी प्रत्येक यांनी त्यांच्याकडे उपलब्ध होणाऱ्या पाठ्य पुस्तकांच्या वाटपाचे नियोजन तयार करावे. उपलब्ध होणाऱ्या पाठ्य पुस्तकांचे प्रत्येक केंद्रातील शाळानिहाय, इयत्तानिहाय, माध्यमनिहाय व विषयनिहाय वर्गीकरण करावे. तालुका पातळीवरून शाळेपर्यंत पाठ्य पुस्तके वाहतुकीसाठी स्थानिक वाहतूकदार नेमण्यात यावा. त्यासाठी ई-निविदा काढण्यात यावी, आदी सुचना प्राथमिक शिक्षण विभागाने गटशिक्षणाधिकारी काढल्या आहेत.

# जीममध्ये तरूणास केली मारहाण



जनता आवाज वृत्तसेवा

**जामखेड** : जीममध्ये तु उशिरा का आलास असे म्हणत एकास जीममध्येच उचलुन फरशीवर आपटले. या घटनेत फीर्यादीच्या डोक्याला मार लागल्याने तो गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर जाम खेड येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी एका जणांविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, दि. ३० मे रोजी सायंकाळी साडेपाच वाजता जामखेड शहरातील एका जीममध्ये फीर्यादी सलमान सुलेमान शेख (वय २९) धंदा मजुरी (रा. पाण्याचे टाकी जवळ, सदाफुले वस्ती, जामखेड) हा नेहमीप्रमाणे व्यायाम करण्यासाठी आला होता. यावेळी या ठिकाणी आरोपी सागर दत्तात्रय मोहळकर हा जीममध्ये आला व फीर्यादीस म्हणाला की, तु जीममध्ये उशीरा का आलास असे म्हणुन फीर्यादी यास शिवीगाळ करण्यास सुरवात केली. त्यावेळी फीर्यादी हा त्यास समजावुन सांगत असताना त्यांने त्याला गालावर चापट मारली व जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्याच्या कंबरेला धरुन वर उचलुन डोक्यावर व मानेवर फरशीवर आपटुन गंभीर जखमी केले. या मारहाणीत फीर्यादी सलमान शेख याच्या डोक्याला व दोन्ही बरगडीला व पायाला गंभीर दुखापत झाली. याप्रकरणी जामखेड पोलिस स्टेशनला आरोपी सागर दत्तात्रय मोहळकर याच्या विरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुम ार सोनवलकर हे करत आहेत.

# राहाता बाजार समितीत कांदा १७०० रुपये

जनता आवाज वृत्तसेवा



**राहाता** : राहाता बाजार समितीत काल कांद्याला जास्तीत जास्त १७०० रुपये भाव मिळाला. मंगळवारी राहाता बाजार समितीत कांद्याच्या १०९१८ गोण्यांची आवक झाली. कांदा नंबर एक ला १३०० ते १७०० रुपये भाव मिळाला. कांदा नंबर दोन ला ८०० ते १२५० रुपये भाव मि ळाला. कांदा नंबर ३ ला ४०० ते ७५० रुपये भाव मिळाला. गोल्टी कांद्याला ८०० ते १२०० रुपये भाव मिळाला. जोड कांद्याला ३०० ते ६०० रुपये भाव मिळाला. काल डाळिंबाच्या २७८५ क्रेटस ची आवक झाली. डाळिंब नंबर एक ला ११६ ते १५० रुपये प्रति किलोला भाव मिळाला. डाळिंब नंबर दोन ला ७१ ते ११५ रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर ३ ला ४१ ते ७० रुपये भाव मिळाला. डाळिंब नंबर चार ला १० ते ४० रुपये भाव मिळाला.

# बारागाव नांदूर पाणी योजनेची साडेसाती संपेना

## पुन्हा पाईपलाईन फुटली; १५ गावांचा पाणीपुरवठा विस्कळीत

जनता आवाज वृत्तसेवा

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील जलसंजीवनी ठरलेल्या बारागाव नांदूर पाणी पुरवठ्याची साडेसाती संपता संपेना. यापूर्वी अनेक वेळा फुटलेली पाईप लाईन पुन्हा फुटल्याने १५ गावांवर निर्जळीची संकट उभे राहिलेले आहे.

गेल्या काही दिवसांपासून या पाणीपुरवठा योजनेला दररोज काहीतरी अडथळे येत आहेत. पाईपलाईन लिकेज, विद्युत पंप नादुरुस्त होणे, वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब कोसळणे आदी कारणांम ुळे बारागाव नांदूरसह डिग्रस, राहुरी खुर्द, तांदुळवाडी, आरडगाव, म ानोरी, वळण, मांजरी, केंदळ खुर्द, केंदळ बुद्रुक, तमनर आखाडा, देसवंडी, कोंढवड, शिलेगाव, पिंप्री



वळण या पंधरा गावांतील सुमारे ८० हजार नागरिकांना महिन्यातून किमान आठ दिवस तरी पाणीटंचाईला सामोरे जावे लागत आहे. पंधरा दिवसांपूर्वी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे विजेचे खांब तुटून पडल्याने वीजपुरवठा खंडित झाला होता. त्यामुळे जवळपास तीन दिवस पाणीपुरवठा बंद होता. त्यानंतर दोन वेळा पाईपलाईन गळती झाल्याम ुळे पाणीपुरवठा पुन्हा खंडित झाला.

आता देसवंडी येथे पुन्हा पाईपलाईन फुटल्याने ही अडचण अधिक तीव्र झाली आहे.

### योजनेची दुरूस्ती होणे गरजेचे

दरम्यान, अजून पावसाळा सुरु झालेला नसून मुळा धरणातून नदीपात्रात पाणी सोडलेले नाही. धरणातून मुळानदी पात्रात पाणी सोडल्यानंतर राहुरी खुर्द येथे दरवर्षी पाईपलाईन वाहून जाते. त्यामुळे पावसाआधीच योजनेची तातडीने दुरुस्ती होणे आवश्यक असल्याची मागणी या गावातील ग्रामस्थांनी केली आहे.

# शिर्डीतील दोन लॉजवर छापा; दोन तरुणांसह ४ महिला ताब्यात

जनता आवाज वृत्तसेवा

**शिर्डी** : शिर्डी शहरातील दोन लॉजवर पोलिसांनी छापा टाकून वेश्या व्यवसाय करणाऱ्या हॉटेल मालक तसेच दोन मॅनेजर यांच्यावर पिटा अंतर्गत कारवाई करत दोन तरुणांसह ४ महिलांना ताब्यात घेऊन त्यांच्यावर देखील कारवाई केली आहे.


शिर्डीतील अवैध गुन्हेगारी व वेश्या व्यवसाय मोडून समूह उच्चाटन करण्यासाठी जिल्हा पोलीस प्रमुख सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली मंगळवारी सायंकाळी शिर्डी शहरातील मध्यवस्तीत असलेल्या हॉटेल सावता व हॉटेल बारकाबाई गेस्ट हाऊसवर वेश्याव्यवसाय चालत असल्याची माहिती गुप्त खबरीने शिर्डी पोलिसांना दिली. त्यानंतर ३ मे रोजी सायंकाळी उपविभागीय पोलिस अधिकारी शिरीष वमने व पोलीस निरीक्षक रणजीत गलांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी एकाच वेळी दोन हॉटेलवर छापा मारला. त्या ठिकाणी असलेल्या चार महिला व दोन तरुणांना पोलिसांनी ताब्यात घेतले. या प्रकरणात दोन्ही हॉटेल मालक व मॅनेजर असे एकूण चार व्यक्तींवर पिटा अंतर्गत कारवाई करण्यात आली आहे.

# बेलापूर-श्रीरामपूर रस्ता दुतर्फा वृक्षारोपण

जनता आवाज वृत्तसेवा

**बेलापूर** : आजचा पर्यावरण दिनाचा मुहुर्त साधून बेलापूर ग्रामपंचायत,सत्यमेव जयते ग्रुप, बेलापूर-ऐनतपूर ग्रामस्थ तसेच गावातील सामाजिक व स्वयंसेवी संघटनांच्या सहकार्याने बेलापूर ते श्रीरामपूर रस्त्याचे दुतर्फा वृक्षलागवड करण्यात येणार आहे.या मोहिमेचा शुभारंभ काल पर्यावरण दिनी करण्यात आले. बेलापूर ते श्रीरामपूर रस्त्याचे चौपदरीकरण करण्यात आले. त्यासाठी दोन्ही बाजुच्या झाडे तोडण्यात आली. सध्या वाढत्या तापमानाचा प्रश्न जटिल बनला आहे. यावर मात करण्यासाठी वृक्ष लागवड व पर्यावरण संवर्धन महत्त्वाचे ठरले आहे.यासाठी सदर रस्त्याचे दुतर्फा वृक्षलागवड करण्याची मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेसाठी बेलापूर ग्रामपंचायत, सत्यमेव जयते ग्रुप, बेलापूर-ऐनतपूर ग्रामस्थ तसेच गावातील सेवाभावी संस्था,संघटनांनी पुढाकार घेवून बेलापूर ते श्रीरामपूर रस्त्याचे दुतर्फा वृक्ष लागवडीचा निर्णय घेतला होता. यासाठी अनेक व्यक्ती, संस्था, संघटना देणगी देवून सहभागी होत आहेत.

# कत्तलीसाठी आणलेली चार जनावरे पोलिसांच्या ताब्यात



जनता आवाज वृत्तसेवा

**लोणी** : कत्तलीच्या उद्देशाने आणलेली गावंश जातीची चार जनावरे राहाता तालुक्यातील ममदापूर येथून लोणी ताब्यात घेतली. पोलिसांनी अनेकदा कारवाई करूनही ममदापूर येथील गोवंश जातीच्या जनावरांना कत्तलीसाठी नेण्याचे प्रकार थांबायला तयार नाही. रविवारी लोणी पोलिसांनी चांडेवाडी रोडवर ग्रामपंचायतीच्या मोकळ्या जागेत झुडुपांमध्ये कत्तलीच्या उद्देशाने बांधलेली चार जनावरे छापा टाकून ताब्यात घेतली. यात दोन गावरान पांढऱ्या रंगाचे दोन खिलारी व एक तांबड्या रंगाची व एक काळ्या रंगाच्या संकरीत (जर्सी) गायीचा समावेश आहे. त्यांचे बाजार मूल्य ८० हजार एवढे आहे. सपोनि कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक फौजदार श्री. आव्हाड, हे. कॉ. काळे, साळवी, शेवाळे यांनी अचानक ममदापूर येथे छापा टाकला. याप्रकतणी लोणी पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. कल्याण मधुकर काळे यांच्या फिर्यादी वरुन आरोपी नजीम बसीर पठाण (रा. ममदापूर, ता. राहाता) व एक अनोळखी एक इसम यांच्या विरुद्ध गुन्हा नोंद केला आहे.

# अकोलेत साडेअठरा किलो प्लास्टिक जप्त

जनता आवाज वृत्तसेवा

**अकोले** : येथील नगरपंचायतच्या मुख्याधिकारी धनश्री पवार यांच्या मार्गदर्शनाखाली जप्ती पथकाने प्लास्टिक बंदीबाबत शहरात ठिकठिकाणी पाहणी केली.

यावेळी १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकच्या पिशव्या, सिंगल यूज प्लास्टिक, चहाचे कप, प्लास्टिक स्ट्रॉचा वापर करणाऱ्या नागरिक दुकानदारांकडे विक्री करत असल्याचे तसेच वापर करत असल्याचे आढळून आले. त्यांच्याकडून सुमारे १८.५ किलो प्लास्टिक जप्त करत १२ हजार ५०० रुपयांची दंडात्मक कारवाई केली आहे.

अकोले शहरात नगरपंचायतने प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती सुरू करत कारवाईचा बडगा देखील उगारला आहे. १२० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या



वापरल्या जाणाऱ्याप्लास्टिकच्या पिशव्या, सिंगल यूज प्लास्टिक, चहाचे कप, प्लास्टिक स्ट्रॉचा वापर किंवा विक्री करु नये.

तसेच पर्यायी व्यवस्था म्हणून कापडी पिशव्यांचा वापर करुन पर्यावरणाचे संरक्षण करण्यास हातभार लावावा, असे आवाहन नगरपंचायतीकडून करण्यात आले आहे.

### या कर्मचाऱ्यांनी केली कारवाई

या प्लास्टिक बंदी मोहिमेमध्ये प्रशासकीय अधिकारी डॉ. योगेश सुकटे, आरोग्य विभागप्रमुख राहुल मंडलिक, सतीश बाळसराफ, मुकादम रामदास साळवे, शहर समन्वयक जयेश भावसार, विजय कोटकर, संतोष खरात व अन्य अधिकारी-कर्मचारी सहभागी झाले होते. या कारवाईचे पर्यावरणप्रेमी नागरिकांनी स्वागत केले आहे.

# अमृत महाआवास अभियानात अहिल्यानगर सर्वोत्कृष्ट

## राज्यात पहिल्या क्रमांकावर; केंद्रीय ग्रामविकास मंत्र्यांच्या हस्ते पुरस्कार

जनता आवाज वृत्तसेवा

**अहिल्यानगर** : अमृत महाआवास अभियानंतर्गत अहिल्यानगर जिल्हा महाराष्ट्रात सर्वोत्कृष्ट ठरला. प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजना या दोन्ही योजनेत जिल्ह्यास प्रथम पुरस्कार मिळाला असून शासनाने जाहीर केलेल्या पाच मानांकनामध्ये जिल्ह्यास ६ पुरस्कार प्राप्त झाले. पुण्यातील बालेवाडी क्रिडा संकुलात झालेल्या पुरस्कार वितरण सोहळ्यात केंद्रीय ग्राम विकास मंत्री शिवराज चौहान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या उपस्थितीत अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या अधिकार्यांनी पुरस्कार स्वीकारला. अमृत महाआवास अभियान २०२२-



प्रधानमंत्री आवास योजना राज्यात सर्वोत्कृष्ट जिल्हा अहिल्यानगर (प्रथम क्रमांक), प्रधानमंत्री आवास योजना राज्यात सर्वोत्कृष्ट तालुका पाथर्डी (प्रथम क्रमांक), राज्य पुरस्कृत आवास योजना राज्यात सर्वोत्कृष्ट जिल्हा अहिल्यानगर (प्रथम), राज्य पुरस्कृत योजना राज्यात सर्वोत्कृष्ट तालुका जामखेड (प्रथम), प्रधानमंत्री आवास योजना राज्यात सर्वोत्कृष्ट गृह संकुल ग्रामपंचायत वागदरी, तालुका श्रीगोंदा, राज्य पुरस्कृत आवास योजना राज्यात सर्वोत्कृष्ट गृह संकुल ग्रामपंचायत नांदगाव, तालुका नगर.

२३ या आर्थिक वर्षात पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर व सध्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संभाजी लांगोरे, प्रकल्प संचालक राहुल शेळके, सहाय्यक अभियंता किरण साळवे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. अमृत महाआवास अभियान राज्यात २० नोव्हेबर २०२२ ते ५ जुन २०२३ या कालावधीत राबविले. जिल्ह्याने प्रधानमंत्री आवास १५ हजार ३२२ व राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत ५ हजार ४२ असे २० हजार ३६४ घरकुले अभियान काळात पूर्ण करण्यात आली आहे. अहिल्यानगर जिल्ह्यात १० गृहसंकुले उभारुन ३०० लाभार्थीना सर्व सुविधांयुक्त घरकुलांचा लाभ देण्यात आलेला आहे. शासनाने वितरीत केलेल्या पुरस्कारांपैकी सर्वात जास्त पुरस्कार पुरस्कार अहिल्यानगर जिल्ह्याला मिळाले आहे.

# श्रीरामपूर तालुक्यात १८ विहिरींची कामे पूर्ण

## स्वावलंबन योजना लाभासाठी महाडिबीटीवर नोंद करा

जनता आवाज वृत्तसेवा

**श्रीरामपूर** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजने अंतर्गत सन २०२३-२४ व २०२५-२५ मध्ये श्रीरामपूर तालुक्यातील १८ विहिरींची कामे पूर्ण झाली, अशी माहिती पंचायत समितीचे कृषी अधिकारी अशोक खेडकर यांनी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना अंतर्गत नवीन व इतर घटकांचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्यांचा मागील तीन-चार वर्षात अल्प प्रतिसाद मिळत होता. त्यांनी विहिरीसाठी गावात जावून बैठका घेवून पात्र असलेल्या लाभार्थ्यांना ऑनलाईन अर्ज कसा करावा, यांचे मार्गदर्शन करत योजनेची सविस्तर माहिती दिली. तसेच ऑनलाईन लॉटरीव्दारे निवड झालेल्या शेतकऱ्यांना आवश्यक कागदपत्रांसाठी सहकार्य केले. प्रशासकीय व तांत्रिक मंजुरीनंतर लाभार्थ्यांना विहीर खोदकामासाठी रेखांकन करून पुढील कामे पूर्ण करण्यासाठी पाठपुरावा केला. अनुसूचित जाती व नवबौद्ध तसेच अनुसूचित जमाती या प्रवर्गामधील शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, त्यांचे जीवनमान उंचावणे व त्यांना आत्मनिर्भर बनवणे या उद्देशाने शासनाकडून डॉ. बाबासाहेब



आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना मधून शेतकऱ्यांना नवीन विहीर (४ लाख), जुनी विहीर दुरुस्ती (१लाख), शेततळ्याचे अस्तरीकरण (२ लाख), विद्युत जोडणी (२० हजार), विद्युत पंप संच / डिझेल पंप संच (४० हजार), इनवेल बोरिंग (४० हजार), पीव्हीसी पाईप (५० हजार), सोलार पंप संचासाठी पूरक अनुदान (५० हजार), तुषार सिंचन संच (४७हजार), ठिबक सिंचन संच (९७ हजार), शेती अवजारे (५० हजार) अनुदान दिले जाते.

### योजनेचा या गावांना मिळाला लाभ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना व बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना या दोन्ही योजनेअंतर्गत अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीतील लाभार्थी शेतकऱ्यांना वांगी खुर्द ५, दिघी ३, निमगाव खैरी ३, माळेवाडी ३, महांकाळ वडगाव ३ खानापूर २ अशा एकुण १९ विहिरी मंजूर झाल्या होत्या. पैकी १८ विहिरीची खोदकामे व बांधकामे पूर्ण झाली आहेत.

आवाज जागरूक जनतेचा
जनता आवाज

अहिल्यानगर, गुरुवार, दि.०५ जून २०२५

# अस्मिता

## असं असावं डाएट...



नोकरीसाठी बाहेर पडणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे. कुटुंब आणि नोकरी करताना त्यांची तारेवरची कसरतच होते. याचा परिणाम अनेकदा त्यांच्या आरोग्यावर होतो. त्यामुळे ही कसरत करत असताना महिलांनी काही गोष्टी मुद्दाम लक्षात ठेवायला हव्यात. ✻ दुसऱ्या दिवशीच्या स्वयंपाकाची तयारी आदल्या दिवशी करून ठेवावी. यात डाळी भिजत घालणे, कडधान्य भिजवून ठेवणे, भाज्या निवडून ठेवणे हे करता येईल. ✻ स्टॅमिना टिकवण्यासाठी डब्यात पोळी बरोबर शक्यतो भाजी ऐवजी उसळी घ्यावी. ✻ बरोबर एखादे फळ, चिक्की, गुळशेंगदाणा लाडू, राजगिरा वडी हे कायम ठेवावे. भूक लागली असं वाटल्यास पटकन तोंडात टाकता येतं. ✻ दोन दिवसांतून एकदा तरी नारळ पाणी प्यावे. ✻ आहारात दूध, पनीर, दही, ताक यांचा समावेश आवर्जून करावा. ✻ अनेक महिला घरातील कामे, इतरांचे डबे भरणे आणि स्वतःचे आवरणे या घाईत नाश्ता न करता बाहेर पडतात. मात्र सकाळी आवर्जून पोटभर खाणे अत्यंत गरजेचे आहे. ✻ सकाळी उठल्यावर स्वयंपाकाची तयारी करता करता चहाऐवजी एक फळ आवर्जून खावे. ✻ संध्याकाळी घरी आल्यानंतर स्वयंपाकाची तयारी करताना लिंबू सरबत घ्यावे. त्यामुळे शरीराला आवश्यक असणारी अँटीऑक्सिडंटस मिळतील आणि ताजेतवाने वाटेल. ✻ रोज झोपताना आठवणीने कडधान्य भिजत घालावीत. सकाळी उठल्यावर कुकरला लावून त्याची भाजी/ उसळ पटकन होते. ✻ मेनोपॉझच्या वयोगटात महिलांना कॅल्शियम गरजेचे असतेच पण त्याबरोबरच प्रथिनांचीही तितकीच आवश्यकता असते. या वयातील महिलांना मधुमेहासारखे आजार असतील तर त्यांनी विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. ✻ सकाळी नाश्त्याला उपयोगी होतील अशी एक पटकन होणारी आणि बरेच प्रकार होतील अशी पाककृती. रात्री दलिया + मूग डाळ + उडीद डाळ भिजवावी. सकाळी आलं, लसूण, कोथिंबीर, मिरची घालून ते वाटावे आणि लगेच या मिश्रणाचे डोसे, उत्तपे, वडे, आप्पे, इडल्या असे पदार्थ बनवू शकता.

## ‘स्वीट सेन्सेशन’च्या निर्मात्या सोनल



मानिनी

लॉकडाऊनच्या काळामध्ये सगळ्यांनीच नवनवीन रेसिपीज ट्राय करून बघितल्या. बहुतांश घरांमध्ये वेगवेगळ्या प्रकारचे केक तयार झाले. बऱ्याचदा घरातल्यांची कितीही मागणी असली, तरी बहुतेक गृहिणी चांगले जमणारे एक-दोन प्रकारचे केकच नेहमी बनवत राहतात. नवीन पद्धत वापरून केक बनवण्याच्या फंदात त्या पडत नाहीत. पण पुण्यातल्या सोनम शिंदे यांनी विविध पदार्थ वापरून चविष्ट तरीही पौष्टिक असे विविध पीठांचे हटके व्हेजकेक तयार केले. मूळच्या जळगावच्या असलेल्या सोनम लग्नानंतर पुण्यात आल्या. नवीन शहरात रूळताना लहान मुलाकडे लक्ष देऊन, घरचे सगळे काम झाले की केकचे प्रयोग त्यांनी सुरू केले. त्यांनी केलेले केक नातेवाईक, मित्रमंडळींमध्ये चांगलेच लोकप्रिय झाले. हे लक्षात घेऊन २०१८ मध्ये त्यांनी केकच्या व्यवसायात उतरण्याचा निर्णय घेतला.

बाजारामध्ये मिळणाऱ्या केकमधले मैदा आणि साखरेचे प्रमाण शरीरासाठी घातक असते. त्यामुळे त्यांनी आरोग्यासाठी पौष्टीक तरीही चविष्ट केक करण्याच्या उद्देशाने भरपूर प्रयोग केले. मैद्याऐवजी गव्हाचे किंवा नाचणीचे पीठ आणि साखरेऐवजी गूळ, खजूर वापरून केक करू शकतो, असे लक्षात आल्यावर त्यांनी त्या दृष्टीने काम सुरू केले. सुरूवातीला केकला लागणारी सगळी सामग्री २५ हजार रुपये भांडवलामध्ये खरेदी केली. बेकिंगमध्ये बेसिक शिक्षण झाले होतेच, पण त्यात वेगवेगळे प्रयोग त्यांनी सुरू ठेवले. मित्रमंडळींना केकची चव चाखायला देत त्याची गुणवत्ता तपासून विविध प्रकारच्या केकच्या रेसिपीज त्यांनी सेट केल्या आणि ‘स्वीट सेन्सेशन’ नावाने व्यवसाय उभा केला. आपण बनवलेला केक लहान मुले खाणार आहेत, असा विचार मनाशी ठेऊन केक बनवताना सर्व नैसर्गिक घटक वापरण्याकडे सोनम यांचा कल आहे.

स्वीट सेन्सेशनमध्ये साखरेऐवजी गूळ पावडर, खजूर, खारीक पूड किंवा नारळाची साखर वापरली जाते. मधुमेही व्यक्तींसाठी खास स्टिव्हिया पावडर वापरुन देखील केक तयार केला जातो. फळांमध्ये केळ, आंबा, सफरचंद, संत्र वापरुन केक बनवले जातात. रवा, कणिक, सातू, नाचणी, बाजरी, ज्वारीसारख्या पौष्टिक धान्याच्या पीठापासून केक केले जातात. तसेच उपवासाला खाता येतील असे खास राजगिरा, भगरीपासून तयार केलेले केक, डाएटप्रेमींसाठी ग्लुटेन फ्री, व्हेगन केक, मल्टिग्रेन, मल्टिमिलेट केक, शुगर फ्री केक त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. काजू, बदाम, आक्रोड, ड्रायफ्रुटसचा वापर केक हेल्दी बनवण्यासाठी केला जातो. फळांचा नैसर्गिक रंग आणि चव केकला असते. त्या सांगतात, केकची ऑर्डर देताना प्रत्येक ग्राहकाचा एकच प्रश्न असतो की हा केक किती दिवस टिकेल. पण कोणतेही प्रिझर्व्हेटिव्ह न वापरल्यामुळे केक एखादा दिवसच टिकतो किंवा फ्रिजमध्ये ठेवून दुसऱ्या दिवशी लगेच संपवावा लागतो. भविष्यात क्लाऊड किचन सुरू करायचं सोनम यांचं स्वप्न आहे. केकच्या दर्जात कोणतीही तडजोड न करणाऱ्या सोनम स्वीट सेन्सेशनचे एक से बढकर एक केक ग्राहकांच्या सेवेत उपलब्ध करतील, याबद्दल शंका नाही.

## चटपटीत आलू-दाल टिक्की

रुचिरा

पावसाळ्याच्या दिवसात चहासोबत काही तरी गरम गरम चटपटीत खावं असं प्रत्येकालाच वाटत असतं. पण त्याच त्याच पदार्थांचा आस्वाद घेण्याऐवजी काही नवीन ट्राय केलं तर... तुम्हीही असा विचार करत असाल तर आलू-दाल टिक्की ट्राय करून बघाच!

**साहित्य-** अर्धी वाटी हरभरा डाळ, दोन वाट्या उकडून मॅश केलेले बटाटे, चार ब्रेड स्लाईस, दोन टेबलस्स्पून लिंबाचा रस, बारीक चिरलेली तीन टेबलस्पून कोथिंबीर, दोन किंवा तीन हिरव्या मिरच्यांचे काप, एक टीस्पून तिखट, एक टीस्पून गरम मसाला, तीन चतुर्थांश जिरं पावडर, एक टीस्पून धने पावडर, तळण्यासाठी तेल, चवीला मीठ.



**कृती-** सर्वप्रथम डाळ दोन ते तीन तास भिजत ठेवावी. त्यानंतर शिजवून घ्यावी आणि पाणी काढून बाजूला ठेवावी. एका बाऊलमध्ये मॅश केलेला बटाटा, डाळ, ब्रेड स्लाईस बारीक चुरून, कोथिंबीर, लिंबाचा रस, हिरव्या मिरच्यांचे काप टाकून मिसळून घ्यावं. या मिश्रणात तिखट, गरम मसाला, धने पावडर, जीरं पावडर, मोहन टाकून मिसळून घ्यावं. हलक्या हाताने मळावं. गोल टिक्की थापून घ्यावी. तव्यावर तेल टाकून घ्यावं. त्यावर टिक्की टाकून सोनेरी रंगावर फ्राय करून घ्या. आवडत्या चटणीसोबत गरम गरम खायला द्या.

## सुपर कुल समर फुटवेअर



तळपत्या उन्हामध्ये बाहेर पडताना त्वचा, केसांची काळजी घेताना पायाकडे दुर्लक्ष नको. चुकीचे फूटवेअर, पायांवर सनस्क्रीन न लावणे, पायावरील घामाकडे दुर्लक्ष करणे अशा गोष्टींमुळे इन्फेक्शन होऊ शकते. उन्हाळ्यात योग्य फुटवेअर वापरून यापासून वाचू शकता. ✻ फ्लिप फ्लॉपः हे सर्वात कॅज्युअल फूटवेअर आहे. रबर फ्लिप फ्लॉप ऐवजी तुम्ही लेदर फ्लिप फ्लॉप वापरा. ते तुमच्या पायांना कोणत्याही इरिटेशन पासून दूर ठेवते. ✻ एस्पाड्रिल्सः फ्लॅट फूटवेअर घालायचे असल्यास तुम्ही एस्पाड्रिल्स निवडू शकता. हे फक्त आरामदायी नाही तर शॉर्ट्स, ट्राउझर्स आणि इतर सर्वच आऊटफिटवर सूट करतात. ✻ स्ट्रॅपी सँडलः कूल दिसण्याबरोबरच पायांना मोकळा श्वास घेऊ द्यायचा असेल तर तुम्ही स्ट्रॅपी सँडल घाला. आकर्षक रंगात येणारे हील्स, वेज किंवा फ्लॅट अशा प्रकारात येणारे स्ट्रॅपी सँडल्स कूल लूक देतात. ✻ स्निकर्सः लाईटवेट आणि कम्फर्टेबल असणारे स्निकर्स तुम्हाला स्पोर्टी लूक देतात. स्निकर्सची सर्वात खास गोष्ट म्हणजे ते तुम्हाला आराम देण्यासोबतच तुमच्या पायांचे संरक्षण करतात. डेनिमसोबत पेअर करून तुम्ही क्लासी लूक मिळवू शकता. ✻ लोफर्सः कॅज्युअल आणि फॉर्मल दोन्हींसाठी वापरायचे असेल तर लोफर्स तुमच्यासाठी एकदम परफेक्ट आहेत. फक्त उन्हाळाच नाही तर तुम्ही वर्षभर हे वापरू शकता. अनेक रंग आणि स्टाईल्समध्ये येणारे लोफर्स तुमच्या कम्फर्ट आणि स्टाईलसाठी परफेक्ट आहेत.

## बारीक होण्यासाठी कमी आहार?



ब्युटी मंत्रा

स्लिम ट्रीम आणि झिरो फिगरच्या नादात अनेक स्त्रिया आपले वजन झपाट्याने कसं कमी होईल, यासाठी प्रयत्न करतात. कोणाच्याही सल्ल्याशिवाय किंवा पुरेशी माहिती न मिळवता आपोआपच डाएट करू लागतात. याबाबत आहारतज्ज्ञ नुपूर पाटील सांगतात, तुमचे जेवण वगळल्याने वारंवार भूक लागण्याची समस्या निर्माण होते. सतत जेवण कमी केल्यामुळे शरीरातील पोषणाची आणि उर्जेची पातळीही कमी होऊ लागते. त्यामुळे जेवण वगळण्याऐवजी आपल्या जेवणात पातळ प्रथिने, भाज्या आणि संपूर्ण धान्य समाविष्ट करा. अन्नातील अनियमिततेमुळे शरीरातील साखरेची पातळी कमी होते. जेवण वगळल्याने शरीराला पोषक आहार मिळत नाही. शरीरात व्हिटॅमिन्स, मिनरल्स, कॅल्शियम आणि प्रोटीन्सची कमतरता वाढू लागते. यामुळे वेदना, थकवा आणि अशक्तपणाचा सामना करावा लागतो. यासोबतच शरीराची कार्यक्षमताही कमी होऊ लागते.

पोषक तत्वांच्या वाढत्या कमतरतेमुळे शरीराची प्रतिकारशक्ती कमी होते. तसेच डिहायड्रेशनचा सामना करावा लागतो. याशिवाय पोषणाच्या कमतरतेचा परिणाम त्वचेवर आणि केसांवरही दिसून येतो. उपासमार वाढल्याने शरीरात सूज येणे, अपचन आणि पचनाच्या समस्या निर्माण होतात. याशिवाय हाडांची कमजोरीही वाढू लागते. कॅलरीज कमी करण्यासाठी, कोणत्याही प्रकारचे प्रक्रिया केलेले अन्न तुमच्या आहारात समाविष्ट करू नका. त्यामुळे शरीरातील कॅलरीजसोबत साखर आणि मीठाचे प्रमाणही वाढू लागते. प्रक्रिया केलेले अन्न हंगामी फळांसह बदला. दररोज सकाळी उठून थोडा व्यायाम करा. यामुळे हाडे मजबूत होतात आणि स्नायूंच्या वाढलेल्या ताणापासूनही आराम मिळतो.

## डॉगीची काळजी घ्या

पेट केअर

पाळीव प्राणी घरातील सगळ्यात लाडका सदस्य असतो. अनेक कुटुंबांमध्ये श्वानांचा पाळीव प्राण्यापेक्षा पोटच्या मुलासारखा सांभाळ केला जातो. पण पावसाळ्यात लाडक्या डॉगीची काळजी घ्यायला हवी. पावसाळ्यात डॉगींना संसर्ग होण्याची शक्यता असते. त्यांना सगळ्यात जास्त त्रास घाणेरड्या पाण्यापासून होत असतो. त्यामुळे डॉगी शक्यतो घाण पाण्यात जाणार नाही याची काळजी घ्यावी. फिरायला गेल्यावर रस्त्यावरील घाण पाण्यात लोळण्याची सवय डॉगींना असते. त्यामुळे त्यांनी असं करू नये याची खबरदारी आपणच घ्यायची असते. अशा पाण्यामुळे त्यांना पारवो व्हायरल होण्याची शक्यता कैकपटींनी वाढते. जुलाब, अतिसार अशी लक्षणं दिसून आली की पारवो व्हायरलची लागण झालेली असू शकते. त्याची तीव्रता जास्त झाली तर गॅस्ट्राईटिस होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याच दिवसात डॉगीचा विणीचा काळही असतो. त्याामुळे फिरायला नेताना भटकी कुत्री त्याच्या आसपासही फिरकणार नाहीत याची काळजी घ्या. डॉगी पावसात भिजून किंवा चिखलात लोळून आलं तर सर्वप्रथम कोरड्या टॉवेलने पुसून घ्या. त्यानंतर त्याचं अंग ड्रायरने कोरडं करा. यामुळे खाज किंवा इतर संसर्गाचा धोका राहणार नाही. या दिवसात डॉगीला हेवी डाएट देऊ नये. कच्ची अंडी देण्याऐवजी उकडून द्यावीत. द्रव पदार्थांची मात्रा आहारात असेल याची काळजी घ्यावी.



पावसाळ्यात अनेकदा डॉगीला फिरायला घेऊन जाणं शक्य होत नाही. त्यामुळे डॉगीमध्ये लठ्ठपणा वाढीस लागू शकतो. हे टाळण्यासाठी त्याला घरातच जिने चढणं आणि उतरण्याचा व्यायाम करू द्यावा. याशिवाय आपणही त्याच्याशी सॉफ्ट बॉलच्या मदतीने खेळू शकतो.

## सन्मानाने जगा

समुपदेशन

मी एक मध्यमवयीन प्रौढा असून एका विचित्र पेचात अडकले आहे. हा पेच मुलीच्या चुकीच्या वागण्यामुळे गहन झाला आहे. माझ्या मुलीने अवघ्या १८ व्या वर्षी हट्टाने प्रेमविवाह केला पण १० वर्षातच पतीचं निधन झाल्यामुळे ती एकटी पडली. अशा वेळी आम्ही तिला आवश्यक ती सर्व मदत केली. तिच्या दोन्ही मुलांच्या शिक्षणाची-संगोपनाची जबाबदारी उचलली. पण आता तिची मुलं मोठी झाली असून शिक्षणासाठी परदेशी गेली आहेत. तीदेखील व्यवसायात स्थिरावली आहे. असं असताना आता तिला आमची गरज उरलेली नाही हे स्पष्ट दिसतंय. तिच्या वागण्यातील बदल आम्ही वेगळं राहण्याबाबत सूचित करत आहे. मात्र आता आमच्याकडच्या सर्व शक्ती संपल्या आहेत. आर्थिक, शारीरिक, मानसिक बळ कमी झालं आहे. अशा परिस्थितीत कुठे जाऊ? कोणता निर्णय घेऊ?

– तुमच्यापुढील पेच खरोखरच खूप मोठा आहे. आई-वडीलांना कामापुरतं बोलावून नंतर दूर करण्याची मुलामुलींची प्रवृत्ती वाढत आहे. खरं पाहता मुलीने तुमचा सांभाळ करायला हवा. पण ती तो नाकारत असेल तर तुम्ही तिला चार खडे बोल सुनावायला हवेत. एकत्र राहणं शक्य नसेल तर तुमची योग्य ठिकाणी सोय करणं तसंच तुमच्या सर्व गरजांच्या पूर्ततेसाठी आर्थिक तजवीज करणं ही तिची नैतिक जबाबदार आहे. ती हे नाकारत असेल तर कायदेशीर सल्ला घेता येईल. पण ही वादावादी आणि जवळच्या नात्यात कटुता नको असेल तर तुमचं घर विकून पैसे करणं आणि त्यावर गुजराण करणं प्राप्त परिस्थितीत शक्य आहे. अर्थार्जन करण्याची शारीरिक आणि मानसिक क्षमता असल्यास त्या मार्गानेही तुम्ही विस्कटलेली आर्थिक घडी सावरुन सन्मानाने जगू शकता.



## उन्हाळ्यात नेसा या फ्रॅबिकच्या साड्या

ट्रेंड्स

प्रत्येकीला साडीमध्ये स्लिम दिसायचे असते. पण प्रत्येकाचे शरीररचना वेगळी असते. काही फॅब्रिकच्या साड्या तुम्हाला स्लिम लूक देण्यासाठी मदत करतात. त्या केवळ स्टायलिशच नाही तर ते खूपच आरामदायक देखील असतात. ✻ जॉर्जेट फॅब्रिकची साडी : हे अतिशय सुरेख फॅब्रिक आहे. या फॅब्रिकच्या साड्या तुम्ही तुमच्या वॉर्डरोबमध्ये ठेवल्या तर त्या तुम्हाला स्लिम आणि फिट दिसण्यास मदत करतील. त्याशिवाय त्या नेसणे आणि कॅरी करणे देखील खूप सोपे आहे. ✻ शिफॉन साडी : प्रत्येक मुलीची शिफॉनची साडी आवडती असते. वजनाने हलकी असण्यासोबतच ती नेसल्याने तुम्ही तरुण आणि थोडे सडपातळही दिसाल. शिफॉनच्या साड्या शरीरावर सहज बसतात आणि त्यांचे प्लीट्सही व्यवस्थित तयार होतात. विशेषत: उन्हाळ्यात शिफॉनच्या साडीत तुम्हाला आरामदायक वाटेल. ✻ क्रेप सिल्क : तुम्हाला सिल्कच्या साड्या आवडत असतील तर रेग्युलर सिल्क कधीही निवडू नका. यात तुम्ही आणखी लठ्ठ दिसू शकता. त्याऐवजी क्रेप सिल्क निवडा. एक चमकदार फॅब्रिक असल्याने शरीरावर एक इल्युजन इफेक्ट निर्माण करते. या साडीचा फॉल खूप चांगला आहे आणि ती नेसल्याने तुम्ही स्लिम दिसाल. ✻ सॉफ्ट कॉटन: हा उन्हाळ्याचा ऋतू आहे आणि वॉर्डरोबमध्ये कॉटनच्या साड्या आवश्यक आहेत. या फॅब्रिकच्या साड्या तुमचा लूक रिच, क्लासी तसेच स्लिम बनवण्यात मदत करतात.



### स्मार्ट मंत्रा

#### कपड्यांना दुर्गंध येतोय?



आता लवकरच पावसाळा सुरूरु होईल. या दिवसात हवा कुंद असते. त्यामुळे कपडे योग्य प्रकारे वाळत नाहीत. अशा वेळी कपड्यातून दुर्गंध येऊ लागतो. हे टाळण्यासाठी कपडे ठेवण्याचं कपाट सुक्या कपड्याने वरचेवर पुसून घ्यावं. या दिवसात महागडे कपडे पेपरमध्ये गुंडाळून ठेवावेत. यासाठी मेणकागदाचा वापर केला तरी चालू शकतो. कपाट सतत बंद ठेवण्यापेक्षा काही काळ उघडं ठेवावं. त्यामुळे कपड्यांमध्येही हवा खेळती राहील.

### किचन टिप्स

#### भांडी अडकून बसल्यास...

चिनी मातीची किंवा धातूची भांडी एकमेकांमध्ये अडकल्यावर लवकर निघत नाहीत. अशा वेळी अडकलेल्या ठिकाणी ग्लिसरीन सोडावं. त्यानंतर थोडासा जोर लावून भांडं ओढावं. बोन चायनाची भांडी स्वच्छ करण्यासाठी लिक्विड सोपचाच वापर करावा. क्रोकरीवर लिंबू आणि ब्लीचचा उपयोग करणं टाळावं. त्यामुळे क्रॉकरीवर चरे पडू शकतात.



### करून तर पहा...

#### बुरशी घालवण्यासाठी...



पाणी साठल्याने भिंतींवर डाग किंवा पोपडे दिसू लागतात. कधी कधी बुरशीदेखील चढते. हे टाळण्यासाठी पाणी आणि व्हिनेगर सम प्रमाणात स्प्रे बॉटलमध्ये भरा. हे मिश्रण स्प्रे बाटलीत भरा आणि भिंतीवर स्प्रे करा. काही काळ तसंच ठेवा आणि मग पुसून घ्या. बुरशी निघून गेलेली असेल. पाणी आणि बेकिंग सोडा सम प्रमाणात घेऊनही हा प्रयोग करता येणं शक्य आहे.